विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१४ |
| वर्ष | : | अठ्ठेचाळिसावे |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१२**

**गणपत्रिका क्रमांक : १७८**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष अठ्ठेचाळिसावे अंक चौथा मार्गशीर्ष/पौष/माघ शके १९३५, जानेवारी २०१४

## *संपादकीय*

### वंदनीय कोण?

''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले'' हे संतवचन लिहिले गेले त्याला आज चारशे वर्षे झाली. हजारो पाने लिहूनही जे सांगता येणार नाही असे मार्गदर्शक तत्त्व संतांनी या एका वाक्यात लिहून ठेवले आहे. 'वंद्य' होण्याकरता लायक कोण, तर ज्याची उक्ती व कृती यांमध्ये फरक नाही तो. दुर्दैवाने पुराणातील ही वांगी पुराणातच राहिली. सर्व विधिनिषेध धाब्यावर बसवून, कमरेचे सोडून डोक्याला बांधणारे आणि ज्ञानाच्या क्षेत्रात कवडीमोल किंमत असणारे मंत्री, संत्री हे या संतवचनाला मूठमाती देण्यात आघाडीवर राहिले. यांचे 'आदर्श' घोटाळे आता जगजाहीरच झाले आहेत. नावात काय आहे; हा साळसूद प्रश्न विचारणाऱ्यांनी 'खोब्रागडे' नावात किती वजन व जादू आहे हे नुकतेच बघितले. सामाजिक असो, राजकीय असो वा धार्मिक असो, प्रत्येक पदांबाबत काही व्यक्त व अव्यक्त जबाबदाऱ्या या पदस्थांच्या शिरावर येऊन पडतात. पण कुठलीही लायकी नसताना किंवा बेताचीच लायकी असताना यांच्या वागणुकीतून साहजिकच व्यक्त होत असतो तो सत्तेचा माज! या सर्व पार्श्वभूमीवर सध्याचा एक राजदूत, एक न्यायाधीश व संपादक यांची प्रकरणे बोलकी आहेत. ''लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण'' या उक्तीप्रमाणे या सर्वांची वागणूक आहे. मांजराने डोळे मिटून जरी दूध प्यायले तरी ती चोरी जशी लपत नाही तशी या सर्व महाभागांच्या वागण्याची लक्तरे आज वेशीवर टांगली गेली आहेत.

(पृष्ठ क्र. ३१ वर)

**प्रसिध्द निवेदिका सौ. धनश्री लेले यांचा कालिदासाचे ''मेघदूत आस्वादक रसग्रहण'' कार्यक्रम दिनांक १८, १९, २०, २१ मार्च २०१४ (मंगळवार ते शुक्रवार), सायं. ७.०० ते ९.०० या वेळात ''सहयोग मंदिर'', ठाणे, येथे आयोजित करण्यात येत आहे. सर्व देणगीदार, वाचक, हितचिंतक व रसिक नागरिकांस विनामूल्य प्रवेश आहे. अधिक माहीती या अंकात इतरत्र पहा. – संपादक**

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ पहिली आजीव सभासद योजना १९७६ ते १९७८ पर्यंत होती. त्याकरता देणगी फक्त २५ रु. होती. (त्यावेळी वार्षिक देणगी २ रु. होती.) काही तांत्रिक कारणाने ती योजना बंद करावी लागली. पुन्हा एप्रिल १९९८ ते मार्च २००० पर्यंत आजीव सभासद योजना अस्तित्वात होती. याकरता ५०० रुपये देणगी होती. गेल्या काही वर्षापासून महागाई उत्तरोत्तर वाढत जात आहे. यामुळे ही योजना एप्रिल २००९ पासून बंद करण्यात आलीव नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| **बँक** | **शाखा** | **शाखा क्रमांक** | **खाते क्र.** |
|---|---|---|---|
| भारतीय स्टेट बँक | जे के ग्राम, ठाणे (प.) | ९०५६. | **१०८८४९३००९५५** |
| ठाणे जनता सहकारी बँक | खोपट, ठाणे(प.) | | १६६८९ |
| ठाणे भारत सहकारी बँक | मुख्य शाखा, नौपाडा, ठाणे(प.) | | २४५२० |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८ ०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर किंवा धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहितीकरता हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दूक्र : २५४७२००५, भ्रक्र: ९८१९६९३१९५

अंकाच्या पाकिटाच्या पत्त्यावर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष दिले आहे.

**- संपादक**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| संध्येतील २४ नावे – व्युत्पत्ती व समानार्थी नावे | ६ |
| 'नामसाधना' या विषयावरील काही बोधवाक्ये | ८ |
| अध्याय १५ : पुरुषोत्तम योग | १२ |
| अध्याय १६ वा : दैवासुरसंपद्विभाग योग | १३ |
| गीतकृष्णायन–भाग ३ . कृष्णलीला | १५ |
| कौटिलीय अर्थशास्त्र | १८ |
| देव पूजनाचे उपचार प्रकार | २० |
| सामान्यासाठी मनःशांती आणि अढळ समाधान | २२ |
| निरंतर सुखाची गुरुकिल्ली | २५ |
| श्रीहनुमत्प्रोक्त मन्त्रराजात्मक रामस्तव | २९ |


### सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्वशीर्षातील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ५०

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

### दीर्घकालीन सभासद (दी का) ऑक्टोबर ते डिसेंबर २०१३

१. श्री. मधुकर त्रिंबक नारळे, नवी मुंबई
२. श्री. धनंजय जोग, बंगलोर
३. श्री. सुनील सावळाराम पाध्ये, बोरीवली, मुंबई
४. श्री. लोपीस माइकल लॉरेन्स, आगाशी, वसई

### देणग्या ऑक्टोबर ते डिसेंबर २०१३

१. श्रीमती. शुभलक्ष्मी बापट, लोणावळा रू१०,०००/-
२. श्री. भास्कर मु. देवस्थळे, चिंचवड रू.१०,०००/-
३. श्री. राम रानडे, उज्जैन रू. १,०००/-
४. श्री. शशिकांत गो. जोशी, डोंबिवली रू. १,०००/-

– संपादक

लेख १७ वा

**अहो गोदावरीवारा भवसिन्धुर्विशुष्यति[२५८]।।**

अहो, गोदावरी नदीच्या पाण्यात अंघोळ केली असता संसाररूपी सागरातली सर्व पापे नष्ट होतात. सुभाषिताची पहिली ओळ –

**न केनापि श्रुतं दृष्टं, वारिणावारि शाम्यति ।**

आत्तापर्यंत कोणी ऐकले नाही किंवा पाहिले पण नाही की पाणीच पाण्याला शोषून टाकते. पण गोदावरी नदीचे पाणी संसाररूपी सागराचे पाणी आटवून टाकते म्हणजे पापे नाहीसे करते. सकृत्‌दर्शनी 'काट्याने काटा काढणे' कण्टकेन कण्टकोद्धरणम् असा अर्थ दिसतो.

**अरण्यं तेन गन्तव्यं, यथारण्यं तथा गृहम्[२५९] ।।**

ज्याच्या घरात स्त्री नाही त्याचे घर म्हणजे अरण्यच. सुभाषिताची पहिली ओळ –

**माता यस्य गृहे नास्ति भार्या च प्रियवादिनी ।**
**अरण्यं तेन गन्तव्यं.... ।।**

दुसरा एक सुभाषितकार म्हणतो,

**' गृहं च गृहिणी हीनं कातारादतिरिच्यते'**

ज्या घरात स्त्री नाही ते घर अरण्याहूनही वाईट.

**अस्य दग्धोदरस्यार्थे किं न कुर्वन्ति पण्डिताः[२६०]।।**

हे पोट जाळण्यासाठी माणसाला काय काय करावे लागत नाही? सुभाषिताची दुसरी ओळः

**वानरीमिव वाग्देवीं नर्तयन्ति गृहे गृहे**

ज्याप्रमाणे माकडाचा खेळ करणारा माकडांना नाचवून आपले पोट भरतो त्याप्रमाणे पंडितालादेखील घरोघर जाऊन वाग्देवीला नाचवावे लागते. (पूजापाठ इत्यादी सांगण्यासाठी)

**अध वाऽब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः[२६१] ।।**

गुजराती म्हण – एक दहाडे मरवूज छे ना? आज नाहीतर १०० वर्षांनी का असेना, मनुष्य मृत्यूच्या पाशातून सुटू शकत नाही. सुभाषिताची पहिली ओळ –

**मृत्योर्भीतोऽसि किं बाल, न स भीतं विमुञ्चति ।**

अरे, मरणाला काय घाबरतोस, मरण काही घाबरलेल्याला सोडणार नाही.

**अत्यादरो भवेद्यत्र कार्यकारणवर्जितः[२६२] ।**

काहीही कारण नसताना एखादी व्यक्ती आपला जर खूप आदर करीत असेल तर समजावे, ह्याला आपल्याकडून काहीतरी स्वार्थ साधून घ्यायचा आहे. सुभाषिताची दुसरी ओळ –

**तत्र शङ्का प्रकर्तव्या परिणामे सुखावहा ।।**

अशा वेळी घेतलेली शंका हितकारक ठरते.

**आयुषः क्षण एकोऽपि न लभ्यः स्वर्णकोटिभिः ।[२६३]**

**स चेद् विफलतां नीतः का नु हानिरितोऽधिका ।।**

प्रत्येक मानवास जगण्यासाठी एक निश्चित वेळ दिलेली आहे. त्या वेळेपेक्षा एक सेकंदही वेळ जास्त त्याला जगायला मिळू शकत नाही. मग तो सुवर्णाची कोटी नाणी द्यायला तयार झाला तरी. आयुष्यातील प्रत्येक क्षण किती महत्त्वाचा आहे हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवे. असा तो मौल्यवान क्षण जर आपण निष्फळ घालवला तर त्यापेक्षा अधिक मोठे नुकसान ते कोणते असे सुभाषितकार विचारित आहे. (हानिः + इतः + अधिका)

**उपकर्तुं यथा स्वल्पः समर्थो न तथा महान् ।**[२६४]

दुसऱ्यावर उपकार करण्यास एखाद्या वेळेस लहान व्यक्ती जितकी समर्थ असते तितके सामर्थ्य मोठ्यातही नसते. सुभाषिताची दुसरी ओळ –

**प्रायः कूपस्तृषां हन्ति सततं न तु वारिधिः ।।**

तहानलेल्या वाटसरूची तहान आडच भागवू शकतो, मोठा समुद्र नव्हे.

**उत्तीर्णे च परेपारे, नौकायाः किं प्रयोजनम् ।।**[२६५]

कामापुरता मामा किंवा गरज सरो वैद्य मरो. सुभाषिताची पहिली ओळ –

**कार्यार्थी भजते लोके यावत्कार्य न सिध्यति ।**

गरज सरो वैद्य मरो न्याय जगाचा, निवडून आल्यावरती कोण कुणाचा. (क्रमशः)

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

**कर्ज काढणे सुलभ आहे; पण...**

पाप करणे किंवा कर्ज करणे यांत लोक सुख मानतात. ऋण काढून सण साजरा करण्यात पुरुषार्थ मानतात. पण पापाचा किंवा कर्जाचा परिणाम अनाकलनीय आहे. भयानक आहे. मी मी म्हणणाऱ्या मोठमोठ्या लोकांचा विनाश करणारा आहे.

व्यक्तीने कर्ज काढले किंवा पाप केले तर व्यक्तीचा नाश होतो. पाप म्हणजे अधःपात करते ते, अशी त्याची शास्त्रीय व्याख्या. (पात यति इति पापम्) वैयक्तिक स्वार्थकरता सुखाकरता दुसऱ्याच्या दुःखाची, भावनांची पर्वा न करता केलेले कर्म म्हणजे पाप. ही त्याची व्यावहारिक व्याख्या.

कर्ज काढताना तात्कालिक सुख लाभते. पाप करतानाही क्षणिक सुख वाटते. पण मनाला आपण पाप करीत असल्याची सुप्त वा प्रकट जाणीव असतेच.

राष्ट्रीय पाप व राष्ट्रीय कर्ज या दोन गोष्टी तात्कालिक सुखदायी असल्या तरी परिणामी अत्यंत घातक आहेत. कर्जापोटी राष्ट्राला आपले स्वत्व गहाण ठेवावे, विकावे लागते. राष्ट्राला कर्जबाजारी बनविणे हे महापातक आहे!

त्याची फळे आपण आज भोगीत आहोत नाही का?

●●●

१९) **नरसिंह** – किंवा नारसिंह. नरः च असौ सिंहः च नरसिंहः। असा ह्या समासाचा विग्रह होतो व समास कर्मधारय होतो. म्हणजे हा माणूस आहे व सिंह पण आहे. वर मागताना प्रल्हादपिता हिरण्यकशिपूने आपला मृत्यू माणसाकडून किंवा पशूकडून होऊ नये असा वर मागितला होता म्हणून परमेश्वराला असा अवतार घेणे भाग पडले की, जो माणूसही नाही व पशूही नाही–आणखी बऱ्याच अटी होत्या. मृत्यू दिवसा होऊ नये अथवा रात्री होऊ नये म्हणून 'संध्याकाळ' साधावी लागली. घरात होऊ नये अथवा घराच्या बाहेर होऊ नये म्हणून उंबरठ्यावर बसून संध्याकाळी नरसिंहाने हिरण्यकशिपूस ठार मारले. म्हणूनच आपणामध्ये संध्याकाळी उंबरठ्यावर बसू नये अशी प्रथा पडली. तसेच कोणत्याही धातूच्या शस्त्राने मृत्यू होऊ नये अशी पण अट होती म्हणून नरसिंहाने नख्यांनी हिरण्यकशिपूचे पोट फाडले इत्यादी.

२०) **अच्युत** – च्यु १ आ. प. पराभाव होणे ह्या धातूचे च्युत हे कर्तरि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण आहे व त्याचे पुल्लिंगी प्रथमा एकवचन च्युतः म्हणजे पराभव झालेला असे होतो व पुढे न च्युतः अच्युतः असा नञ् तत्पुरुष समास होतो व त्यापासून अनेक अर्थ निघतात. उदा. आपला प्रभाव, सामर्थ्य, सद्गुण, स्वभाव इत्यादींपासून जो कधी ढळत नाही (च्युत) असा तो अच्युत.

अमरकोशामध्ये विष्णूची जी ३९ नावे दिली आहेत, त्यापैकी अच्युत हे नाव आहे.

२१) **जनार्दन** – अर्द् १ प.प. विनाश करणे. जनानां दुःखस्य अर्दनं करोति सः अथवा दैत्यानैम् अर्दनं करोति सः इति वा। लोकांच्या दुःखाचा अथवा राक्षसांचा नाश करणारा.

अर्द् ह्या धातूचा याचना करणे असाही अर्थ आहे. त्यानुसार जनैः अर्द्यते (कर्मणि)– लोक ज्याची याचना करतात असा ईश्वर.

२२) **उपेन्द्र** – उप ह्या अव्ययाचा अर्थ जवळ असा आहे. उप + इन्द्र (अ+इ+ए गुणसंधी) म्हणजे इन्द्राचा धाकटा भाऊ. उपेन्द्र हा इन्द्राचा धाकटा भाऊ म्हटला तरी तो इन्द्रापेक्षा सर्व प्रकारे अधिक श्रेष्ठच असतो. याला आधार अष्टाध्यायीमधील खालील सूत्र आहे. उपोऽधिके च। अध्याय पहिला, पाद ४ था, सूत्र ८७ वे. भट्टोजी दीक्षितांनी सिद्धान्तकौमुदी ह्या ग्रन्थात ह्या सूत्राची खालीलप्रमाणे वृत्ती दिली आहे. सूत्र ५५१ – (कारक प्रकरण) अधिके द्योत्ये उपेत्यव्ययं कर्मप्रवचनीय संज्ञम् स्यात्। म्हणजे द्वितीया न योजना 'अधिक' (उप) ह्या अर्थी सप्तमी योजावी...इत्यादी उप + इन्द्रे।

२३) **हरि** – हरति इति हरिः। भक्तांचे पाप ताप हरण करणारा. भक्तशत्रूंची, धर्मविध्वंसकांची, दैत्यांची शिरे हरण करणारा. भक्तांचे चित्त हरण करणारा. त्याच्याशी विरोध करणारांचे सर्व प्रयत्न हरविणारा, निष्फळ ठरविणारा.

२४) **श्रीकृष्ण** – त्रिकालाबाधित सत्ता व आनन्द हे त्याचे स्वरूप लक्षण आहे. कृष् ६ प.प.+ण. श्री–विभूति तिने युक्त तो श्रीकृष्ण. तो सर्व

विश्वाचे नियमन-कर्षण करतो म्हणून त्यास कृष्ण म्हणतात. कृष्ण-सच्चिदानंदघन परब्रह्म।


**खुलासा** - अमरकोशात विष्णुची जी ३९ नावे दिली आहेत, त्यातील फक्त १७ नावे संध्येमध्ये आली आहेत. खालील ७ नावे आलेली नाहीत. १) वामन (८ वे) २) श्रीधर (९ वे) ३) संकर्षण (१३ वे) ४) प्रद्युम्न (१५ वे) ५) अनिरुद्ध (१६ वे) ६) नरसिंह (१९ वे) ७) हरि (२३ वे) म्हणजे विष्णूची ३९ + ७ =४६ नावे होतात. अमरकोशातील संध्येमध्ये जी नावे आलेली नाहीत ती माहितीसाठी खाली देत आहोत. ३९-१७ =२२ ती २२ आहेत. १) वैकुण्ठ २) विष्टरश्रवा ३) स्वभूः ४) दैत्यारिः ५) पुण्डरीकाक्ष ६) गरुडध्वज ७) पीताम्बर ८) शार्ङ्गी ९) विष्वक्सेन १०) इन्द्रवरज ११) चक्रपाणि १२) चतुर्भुज १३) देवकीनन्दन १४) शौरि १५) श्रीपति १६) वनमाली १७) बलिध्वंसी १८) कंसाराति १९) विश्वंभर २०) कैरभजित् २१) विधुः २२) श्रीवत्सलाञ्छन

याप्रमाणे ही लेखमाला येथे पूर्ण झाली.

श्रीविष्णवे नमः। श्रीविष्णवे नमः। श्रीविष्णवे नमः।

**दि. दा. औटी**

●●●



**जाणीव म्हणजे त्याग...**

इहीं दोन्हीं की शब्दीं।
त्यागुचि बोलिजे त्रिशुद्धी।
परी कारण एथ भेदी। येतुलेंचि॥
जें निपटूनि कर्म सांडिजे।
ते सांडणे संन्यासु बोलिजे।
आणि फळमात्र कां त्यजिजे।
ते त्यागूगा॥

संन्यास आणि त्याग दोन्ही शब्दांचा अर्थ एकच यांत शंका नाही. पण त्यांच्या अर्थांत सूक्ष्मभेद आहे तो असा -

मी येथवर केलेल्या कर्माचा, संसाराचा, संपादित केलेल्या स्थावर जंगत इस्टेटीचा त्याग करीत आहे, अशी भावना धारण असते त्यात कतृत्वाचा जो अहंकार असतो. तो त्याग, बुद्धीत, त्यागात नसतो. माझ्या देहाकडून जी स्वाभाविकपणे कर्मे घडत आहेत त्यांचा कर्ता मी नाही. त्यांचा कर्ताकरविता परमेश्वर आहे. या जाणिवेने त्या कर्मांचा व त्यांच्या फळांचा त्याग करणे त्याला त्याग म्हणतात.

संन्यास आणि त्याग हे दोन्ही जवळजवळ समानार्थक आहेत. परस्परांना पूरक आहेत. पण त्यांत भेद आहे तो 'अहं'चा. ज्यांत'अहं'चा स्पर्शही नाही तो त्याग.

'तुझिया सत्तेने सूर्यासि उगवणे, वायूसि विचरणे। : त्याप्रमाणे तुझ्या सत्तेने माझ्या देहाकडून कर्मे होतात. त्यांना फळे मिळतात, पण जर कर्मावर माझा अधिकार नाही तर त्यांच्या फळावर माझी सत्ता कशी असणार? असणारच नाही ही जाणीव म्हणजे त्याग.

●●●

**नामसाधना करणाऱ्या नामसाधकाने साधना सिद्ध होण्यासाठी आचरण कसे ठेवावे, संसार कसा करावा, काय पथ्ये पाळावीत या विषयावरील काही बोधवाक्ये** :

१) मायेच्या प्रभावामुळे वस्तुभोगातच खरे सुख आहे, अशा भ्रमात संसारी मनुष्य असतो. परमार्थात मिळणाऱ्या इन्द्रियातीत विशुद्ध आनंदाची कल्पनाही त्याला नसते.

२) निजही आपला बन्धू स्वयें जिंकी निजास जो। निजास सोडता स्वैर आपुला शत्रु होय तो।। भ.गी., अ.६, श्लोक ६

३) संसारातील सर्व कर्तव्ये, ती देवानेच आज्ञापिली आहेत, असे समजून केवळ देवाचा सेवक या नात्याने, नेटाने करावी म्हणजे प्रपंच व परमार्थ दोन्हीही साध्य होतात.

४) देहाने करता कार्य धरावा राम तो मनीं। कर्म कर्तृत्व फलही अर्पावे सर्व त्यासही।।

५) प्रपंचातील कर्तव्ये शुद्ध मनाने, सदाचाराने व भगवंताचे अधिष्ठान ठेवून केली तर प्रपंच सुखावह होऊन परमार्थही घडतो.

६) माणसाच्या अतृप्त वासनाच त्याला जन्मतृत्यूच्या फेऱ्यांत अडकवून ठेवतात. वासना मारण्यासाठी प्रथम अहंकार मारला पाहिजे आणि अहंकार मारण्यास 'नाम' हेच एक अमोघ औषध आहे.

७) प्रपंचातील नियत कर्मे गीतेत ९ व्या अध्यायात सांगितलेल्या राजगुह्ययोगाच्या युक्तीने केल्यास संसार सुखासमाधानाचा होऊन मनुष्य पारमार्थिक सुखाचाही आनंद अनुभवू शकतो.

८) संसारातील भौतिक सुखे चिरकाळ टिकणारी नसतात व उपाध्या मागे ठेवून जातात आणि म्हणून दुःखान्तच होतात. जगातील सर्व सुखे एकत्र केली तरी ती ईशकृपेच्या दिव्यानंदाची बरोबरी करू शकत नाहीत.

९) अति गरीब नाही, अति श्रीमंत नाही, असा मध्यम स्थितीतला मनुष्यच समाधानी असण्याची शक्यता जास्त असते.

१०) घरातील गृहकृत्ये ही आपल्याला ईश्वरानेच नेमून दिली आहेत अशी धारणा ठेवून केवळ ईश्वराची सेवक म्हणून गृहकृत्ये करणारी गृहिणी गीतेत ९ व्या अध्यायात सांगितलेला राजगुह्ययोगच आचरीत असते.

११) माणसाला अहंकाराची बाधा होण्यास, विद्वता, वैभव आणि सत्ता या गोष्टीच असाव्या लागतात असे मुळीच नाही. अहंकार हा मनुष्यप्राण्यांचा सहज (Congenital) रोग आहे.

१२) या जन्मात केलेल्या परोपकारांची व परमार्थाची शिदोरीच पुढील जन्मात उपयोगी पडते, म्हणून वेळ न दवडता आपण प्रपंच करीत असताना परमार्थाला लागावे.

१३) आपण (संसार करत असताना)

ईशप्राप्तीसाठी निष्ठेने व प्रेमाने झटत राहिलो तर ईश्वर आपल्या प्रपंचाची काळजी घेतो व आपल्या प्रापंचिक प्रयत्नांनाही भरपूर यश देतो.

१४) ईश्वरावर निःस्वार्थी प्रेम जडले, म्हणजेच ईश्वराशी अनुसंधान जमले की ईशकृपेचे संरक्षण आपोआपच मिळते.

१५) 'हातांनी काम आणि मनात राम' या पद्धतीने प्रपंच केला, तर फळाची काळजी उरत नाही व परमार्थही आपोआप घडत राहतो.

१६) विषयांवरील न शमणारी आसक्ती, व देवावरील निःस्वार्थी प्रेम या दोन गोष्टी एकाच वेळी जवळ-जवळ राहू शकत नाहीत; जसे 'एका म्यानात दोन तलवारी'.

१७) 'आहे त्यात समाधान मानावे' याचा अर्थ प्रगतीसाठी कष्ट सोडून द्यावे, निष्क्रिय व्हावे असा नाही. मिळाले त्यापेक्षा जास्त मिळविण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे, मात्र तो फलासंग सोडून असावा.

१८) ज्याप्रमाणे अग्नीत इंधन घातल्याने तो शान्त न होता आणखीनच भडकतो, त्याप्रमाणे आसक्तीने कामोपभोग घेतल्यास कामासक्ती शान्त न होता ती आणखीनच तीव्र होते.

१९) सर्व माणसे ही एकाच ईश्वराची लेकरे आहेत व सर्व त्याचेच प्रेमार्थी आहेत हा सर्व माणसांतला साम्यभाव आपण ओळखला तरच आपण 'निर्वैर सर्वभूतेषु' होऊ शकतो.

२०)'मी पणा' धरून केलेली कर्मे नेहमी दुःखान्तच होतात म्हणून फलाशासंग सोडून फळाचा भागही रामावरच सोपवून प्रपंचात कर्मे करावी.

२१) विषय-भोगाने विषयांवरील आसक्ती वाढतच राहते व त्यामुळे परमार्थाची ओढ कमी होत जाते. या दोन्ही गोष्टींवर 'नाम' हे एकच अ त्यंत प्रभावी औषध आहे.

२२) 'नामस्मरण' म्हणजे प्रपंच व परमार्थाच्या मधल्या उंबरठ्यावर ठेवलेला जणू दिवाच आहे. त्यामुळे त्याच्या प्रकाशात दोन्हीकडील योग्य (श्रेय) मार्ग दिसतात. ते आचरल्यास संसार सुखाचा होतो व परमार्थाच्या मार्गावरही प्रगती होऊ शकते.

२३) प्रपंच कर्मयोगाच्या (राजविद्या राजगुह्ययोगाने) युक्तीने केल्यास तो परमार्थाच्या आड न येता परमार्थाचे मोठे साधनच बनू शकतो.

२४) प्रपंचातील कर्तव्ये सर्व बलबुद्धी पणास लावून केलीच पाहिजेत. पण ती फलाचा संग सोडून, ईश्वराचे अधिष्ठान ठेवून केली तर प्रपंच सुखाचा होतो व परमार्थाचे चिरसुखही मिळते.

२५) भौतिक लाभांची इच्छा मनात ठेवून त्याच (स्वार्थी) हेतूने केलेली देवसंतांची भक्ती किंवा सेवा ही परमार्थाच्या दृष्टीने व्यर्थ होय. निःस्वार्थ वृत्तीने केलेली भक्तीसाठीच भक्ती ईशप्रेमाचा आनंद देऊ शकते.

२६) ईश्वराचे अधिष्ठान न ठेवता धनसत्तेच्या मागे लागलेले कामलंपट लोक, बाह्यतः वैभवात लोळताना दिसले तरी त्यांचे मन मात्र भय, काळजी व अतृप्त लालसेने पोखरलेले असते. त्यांना शान्ती व समाधान कधीच मिळत नाही.

२७) उद्योगसंस्था ज्याप्रमाणे वर्षाअखेरी गेल्या

वर्षातील कार्याचा आढावा घेऊन अहवाल सादर करतात, त्याचप्रमाणे आपण आपल्या वाढदिवशी गेल्या वर्षात केलेल्या पारमार्थिक प्रगतीचा आढावा घ्यावा.

२८) सर्वसाक्षी परमेश्वर जसा सर्व सृष्टीला व्यापून राहिला आहे, त्याचप्रमाणे आपला आत्मा (परमात्म्याचा अंश) आपल्या देहाला व्यापून राहिला आहे. म्हणून त्याचेच अनुकरण करून आपण साक्षित्वाने राहण्यास शिकले पाहिजे.

२९) गृहस्थाश्रम चारी आश्रमांत श्रेष्ठ आहे. कारण त्यात चारही पुरुषार्थ साधता येतात. संत एकनाथांच्या आदर्श संसारातले दिव्य सुख चाखण्याचा मोह प्रत्यक्ष परमेश्वरालाही आवरता आला नाही, म्हणून तो पाणक्या होऊन नाथांच्या घरी राहिला होता.

३०) प्रपंचातील कर्तव्ये 'कर्ता मी' ही भावना टाकून 'रामच खरा कर्ता' या श्रद्धेने केली तर प्रपंच चांगला होतोच, पण परमार्थही उत्तम साधला जातो.

**संत आणि सत्संग या विषयावरील काही बोधवाक्ये**

१) माणूस कसा आहे हे तो कोणती संगत ठेवतो हे पाहून सांगता येते. संतसंगतीने मनुष्याला संतगुण लाभतात व त्याची मोक्षमार्गावर उत्तम प्रगती होऊ शकते.

२) संतसंगतीने (नारदांच्या उपदेशाने) वाल्याचा वाल्मीकी ऋषी झाला. (खऱ्या) संताचा प्रत्यक्ष सहवास लाभणे आजकाल कठीण असले तरी जुन्या संतांचे वाङ्मय वाचून आचरण सुधारण्याचा मार्ग मात्र सर्वांना खुला आहे.

३) कर्मयोगी संत प्रापंचिक कार्ये कामासक्त माणसाच्या हिरिरीनेच करत असल्यामुळे त्याला ओळखणे कठीण जाते.

४) सामान्य प्रापंचिकाला विषय जिंकतात, तर खरे संत विषयांना जिंकतात.

५) संतसंगाने व त्यांचा उपदेश आचरल्याने देहबुद्धी कमी होऊन देवबुद्धी वाढते.

६) आपले देवाशी अनुसंधान जुळवून देणारे संत खरोखर आपल्याला देवासारखेच वाटावेत इतके त्यांचे आपल्यावर उपकार असतात.

७) संतसंगतीने विषयांची गोडी कमी होते, तर विषयांची गोडी कमी झाली की संतसंगतीची ओढ वाढू लागते.

८) सत्याचा मार्ग कृतीत आणतो तोच खरा संत, केवळ वेदाध्ययनाने मनुष्य संत बनत नाही.

९) जैसे करती अज्ञानी कर्म कर्मात सक्त जे।
असक्त तैसे झाल्याने करावे लोककार्य ते।।
भ.गी., अ.३, श्लोक.२५

१०) जे कठोर साधनेने, कडक तपश्चर्येनेही साध्य होण्यास कठीण ते अनुसंधान संतकृपेने सहज साधते.

११) विडीचा झुरका मारणाऱ्या माणसाला वाटते की तो विडीचा स्वाद उपभोगत आहे, पण वस्तुतः विडीच त्याच्या फुप्फुसांचा भोग घेऊन त्यांना पोखरत असते. 'भोगाः न भुक्ताः वयमेव भुक्ताः।' (भर्तृहरी)

१२) शास्त्रवचने वाचूनसुद्धा जे ज्ञान मिळण्यास कठीण तेच संतसंगाने आपोआप मिळते.

१३) संतवचने आपल्याला भावली व त्याप्रमाणे वृत्तीत बदल झाला तरच खरा संतसमागम झाला असे म्हणावयाचे!

१४) अर्थ म्हणजे अनर्थ (अर्थमनर्थं भावय नित्यम्। आ. शंकराचार्य) असे म्हणतात ते सर्वथा खरे नाही. अर्थ (पैसा) वस्तुतः वाईट नाही. परंतु अर्थाचा अतिलोभ आणि त्याचा आय व व्यय वाममार्गाने झाला तर मात्र अनर्थ ओढवतो.

१५) जो प्रापंचिक सन्मार्गाने स्वकष्टाने पैसे कमावतो व परोपकरार्थ त्यांचा व्यय करतो तोच खरा संत!

१६) प्रपंचातील नित्य नियत कर्मे पार पाडत असताना 'मी भगवंताचा आहे' ही जाणीव ठेवा असे संत सांगतात.

१७) संत विषयांत देव पाहतात, तर आपण देवांत विषय पाहतो. विषयकामनापूर्तीसाठी केलेली साधना पारमार्थिक दृष्टीने व्यर्थ होय. अशा साधनेने कदाचित वस्तुलाभ होतील, पण मोक्षमार्गावर प्रगती होणार नाही.

१८) भवरोगाची जाणीव होऊन त्यापासून मुक्त होण्याची जर इच्छा असेल तर संत सांगतात त्याप्रमाणे नामाचे औषध घेऊन सदाचाराचे पथ्य पाळावेच लागेल.

१९) परमेश्वराशी अनुसंधान साधले असतानासुद्धा सर्व बलबुद्धीने, परंतु निष्काम वृत्तीने संसारातील नियत कर्मे व लोकसंग्राहक कार्ये करीत राहणे हाच खरा कर्मयोग, असे संतांचे प्रापंचिकाला सांगणे आहे.

२०) आम्हांला दुसऱ्या व्यक्तीबद्दल वाटणाऱ्या भौतिक प्रेमाचा उगम वस्तुतः निजस्वार्थातच असतो. संतांना सर्वभूतीं वाटणाऱ्या प्रेमाचा उगम मात्र भगवद्भक्तीत असतो.

२१) मानवाचा जन्म मिळाल्यानंतर खरा संत भेटणे व त्याचा सहवास लाभणे यापरी इहलोकात दुसरे भाग्य नाही.

२२) संसारातील आपल्या नियत कर्तव्यांकडे किंचितही दुर्लक्ष न करता तो नेटका करूनच परमार्थ साधता येतो, हेच भागवत-संतांचे मुख्य सांगणे आहे.

२३) संत सांगतात की भौतिकदृष्ट्या मनुष्य कोणत्याही स्तरावर असो; मनःशुद्ध, सदाचार आणि परमेश्वरावर दृढ श्रद्धा या त्रयीच्या जोरावर तो शांती-समाधान मिळवून आयुष्य सार्थकी लावू शकतो.

२४) विषयांची आसक्ती हृदयातून काढून टाकल्याशिवाय भगवत्-प्रेमाला तेथे जागा होत नाही, मग त्याच्याशी अनुसंधान कसे साधणार?

२५) परब्रह्म जरी निर्गुण असले तरी त्याच्याशी अद्वैत साधण्यासाठी प्रथम सगुण भक्तीनेच सुरुवात करावी लागते. सगुण नामभक्तीच आपल्याला पुढे निर्गुणाप्रती घेऊन जाते.

२६) संतांनी भगवंताला आणिले सगुणामधे।
उपकारचि संतांचा भला अम्हांवरी असे।।

२७) भगवत्प्राप्तीसाठी साधना करीत असतानासुद्धा माणसाने देशाची व समाजाची

(पृष्ठ १९ वर ....)

## अध्याय १५ वा : पुरुषोत्तम योग

अश्वत्थ वृक्षाची मुळे आणि विस्तार। उपमान उपमेय ईश्वर आणि संसार।। जीवात्मा परमात्मा, क्षर आणि अक्षर। पुरुषोत्तम योग पंधरावा।।

खाली फांद्या मुळे वरती। याला अविनाशी पिंपळ म्हणती।। वेद त्याची पाने असती। हे जाणी, तो वेदज्ञ।।१।।

त्रिगुणांनी वाढलेला विषयांचा पर्णभार। यांच्या शाखांचा खालीवर विस्तार।। मानवलोकी कर्मानुसार। मुळे असती पसरलेली।।२।।

याचे स्वरुप दिसत नसे। आदि, स्थिती, अंतही नसे।। वैराग्य शस्त्र घ्यावे तीक्ष्णसे। याची मुळे तोडावी।।३।।

जेथून संसाराचा विस्तार झाला। शरण जावे त्या आदि पुरुषाला।। शोधून मिळवावे परम पदाला। जेथून नसे पुनरागमन।।४।।

निगर्वी, निर्मोही, निरिच्छ, द्वंद्वातीत। जितेंद्रिय, ईश्वरस्वरुपी नित्य स्थित।। ऐसे ज्ञानवंत अंती जातात। अविनाशी परम पदाप्रति।।५।।

उजळविणे त्या स्थानाला। अशक्य शशि, सूर्य, अग्नीला।। जेथून निवृत्ती नसे योग्याला। तेच माझे परमधाम।।६।।

माझा एक अंश सनातन। जीव लोकी जीवात्मा बनून।। शरीरी राहून करितो नियमन। मनादि सहा इंदियांचे।।७।।

जीवात्मा जेव्हा सोडतो कलेवर। आणि मिळवितो नवीन शरीर।। सहा इंद्रियें ही नेतो बरोबर। जैसा सुगंध वायू नेई।।८।।

पंच ज्ञानेंद्रिये आणि मन। आहे जीवात्म्याचे आश्रयस्थान।। उपभोग घेणे तेथे राहून। त्यांच्या त्यांच्या विषयांचा ।।९।।

त्रिगुणात्मक जीवात्म्याचा शरीर त्याग। अथवा शरीरी राहून विषयांचा भोग।। जाणती ज्यांचे ज्ञानचक्षू सजग। अज्ञा जनां हे न कळे।।१०।।

हृदय स्थ आत्म्याला योगी यती। प्रयत्न केल्याने जाणू शकती।। प्रयत्नांतीही अज्ञानी अज्ञ राहती। चित्त शुद्धी नसल्याने ।।११।।

सूर्य प्रकाशाची प्रखरता। चंद्रकिरणांची शीतलता।। अथवा अग्नीची दाहकता। अंश माझ्याच तेजाचे।।१२।।

पृथ्वीमध्यें समाविष्ट होऊन। प्राणिमात्रांचे करितो पोषण।। रसरूपाने चंद्र किरणांतून। पुष्ट करितो वनस्पती।।१३।।

जीव शरीरी वैश्वानर बनून। प्राण अपान सवे घेऊन।। चतुर्विध अन्नांचे करितो पाचन। मीच असे तो अग्नीही।।१४।।

सर्वांचे अंतर्यामी मीच असतो। स्मृति विस्मृति ज्ञान देतो।। वेदांचा कर्ता, वेद जाणतो। जाणण्यायोग्यही मीच।।१५।।

स्थावर जंगम हे नाशवंत। केवळ आत्मतत्त्व अनंत।। दोन विभाग हे सहजगत। या संपूर्ण सृष्टीचे ।।१६।।

परमात्मा उत्तम पुरुष जाण। अविनाशित्व असे

त्याची खूण ।। तिन्ही लोकांचे करी संगोपन। त्रैलोक्य सर्व व्यापुनिया ।।१७।।

क्षर, जड वस्तूंपेक्षा श्रेष्ठ। अक्षर, जीवात्म्याहून वरिष्ठ ।। त्रिलोकी, वेदांतही मी विशिष्ट। पुरुषोत्तम नामे ज्ञात असे ।।१८ ।।

जे ज्ञानवंत पुरुष असती। मीच पुरुषोत्तम ऐसे जाणती ।। ते सर्व भावे निरंतर भजती। वासुदेवरूपी परमेश्वरा ।।१९ ।।

हे गूढतम ज्ञान। जाणून होई जो बुद्धिमान ।। त्याचे होईल कृतार्थ जीवन। निष्पाप अर्जुना, समज तू ।।२० ।।

आश्रय घ्यावा बुद्धियोगाचा। त्याग करावा कर्मफलांचा ।। ध्यानात ध्यास ईश्वर रूपाचा। सगुण भक्ती करावी ।। संसार नश्वर अश्वत्थाचा विस्तार। मूळ त्याचे ईश्वर निराकार ।। पुरुषोत्तमाचे स्वरूप अक्षर। पुरुषोत्तम योग समाप्त ।।

।। **श्रीकृष्णार्पणमस्तु** ।।

## अध्याय १६ वा : दैवासुरसंपद्विभाग योग

दैवी आणि आसुरी संपत्ति । वर्णन आणि फलनिष्पत्ति ।। सशास्त्र आचार, विपरीत कृति। दैवासुर संपद्विभाग षोडष ।।

**श्रीभगवान सांगतात :**

निर्भयता, चित्तशुद्धी, सत्पात्री दान। अध्यात्मज्ञानी स्थिर, ईश्वर भजन ।। तप, यज्ञ, अहिंसा, इंद्रिय दमन। सत्प्रवृत्त, सत्यवादी ।। अक्रोधी, त्यागी, अविचल भाव। निष्काम भूतदया, दुर्बुद्धीचा अभाव ।। दुष्कर्मांची शरम, अनासक्ति, मार्दव, निरर्थक कर्मे टाळणे. तेजस्वी, क्षमाशील, निर्वैर। धैर्यवान, शुचिर्भूत, निरहंकार ।। ज्याला लाभे हा गुणसंभार। दैवी संपदा त्याची असे ।।१-२-३ ।।

ढोंगी, गर्विष्ठ, घमेंडखोर। तामसी, अज्ञानी, भाषणी कठोर ।। ज्यांच्या जवळ हे दुर्गुण प्रकार। त्यांची संपदा आसुरी ।।४ ।।

मोक्ष देते दैवी संपत्ती। आसुरी बद्ध करिते, म्हणती ।। तुजपाशी दैवी गुण असती। शोक न करी, अर्जुना ।।५ ।।

दैवी आणि आसुरी प्रवृत्ती। दोन प्रकार हे प्राण्यांत असती ।। दैवी गुणांची ऐकलीस माहिती। आसुरी सविस्तर सांगतो ।।६ ।।

काय करावे, काय टाळावे। न जाणती आसुरी, आपल्या स्वभावे ।। पावित्र्य, सदाचार, सत्य बोलावे। हेही नसते माहीत ।।७ ।।

विश्व असत्य, निरीश्वर, निराधार। संयोगावाचून उपजला संसार ।। भोगांसाठीच जन्म असणार। अन्य कारण नसे म्हणती ।।८ ।।

घातकी, अल्पबुद्धी, क्रूरकर्मी जन। अयोग्य विचारांना अनुसरून ।। नष्टात्मे हे होतात उत्पन्न। नाशासाठी जगाच्या ।।९ ।।

दांभिक, गर्विष्ठ, उन्मत्त जन। आसुरी सिद्धान्त स्वीकारून ।। अंतहीन वासनांच्या मागे लागून। पापमार्गे चालती ।।१० ।।

आजीवन अनंत चिंता वाहती। इच्छापूर्तीत तत्पर असती ।। इतकेच आपुले कर्तव्य मानिती। निश्चय करून मनाचा ।।११ ।।

शेकडो आशांनी बद्ध असती। काम क्रोधाच्या अधीन जाती ।। अन्याय्य संपत्तीची इच्छा धरिती।

काम भोग पूर्तीस्तव ।।१२ ।।

ही वस्तू आज मिळविली मी । दुसरीही इच्छापूर्ती करीन मी ।। या द्रव्याचा आज धनी मी। आणखीही मिळवीन ।।१३ ।।

आज या शत्रूला मारले मी । दुसऱ्यानाही मारीन मी ।। अधिपती, भोगी, सिद्ध मी । सुखी आणि बलवंत।।१४ ।।

श्रीमंत, बहुतांचा पालनकर्ता मी । मजसम दुसरी नसे असामी ।। यज्ञदानांनी आनंद मिळवीन मी । बडबडती अज्ञाने मोहाने ।।१५ ।।

ऐसे बहुप्रकारे भ्रमित चित्त । मोहांत लडबडलेले विषयासक्त ।। अंती हे आसुरी दुर्गुणानी युक्त। जाती अपवित्र नर्क लोकी ।।१६।।

अहंकारी, घमेंडी जे असती । धन मानाने उन्मत्त होती ।। शास्त्रविरहित यज्ञ करिती । ढोंगीपणाने नावापुरता ।।१७ ।।

अहंकारी, बलवान, विषयासक्त । मत्सरी, उन्मत्त, क्रोधयुक्त ।। ईश्वराची निंदा, द्वेष करतात । सर्वांचे शरीरी राहणाऱ्या ।।१८ ।।

अशा अवलक्षणी क्रूरांना। द्वेषी, पापी, नराधमांना ।। आसुरी योनीत जन्म त्यांना । दुसऱ्या जन्मी देतो मी ।।१९ ।।

जन्मोजन्मी ते अज्ञानी। आसुरी योनीत जन्म मिळोनि ।। माझी प्राप्ती अशक्य होवोनि । नीच गतीला जातात ।।२० ।।

काम, क्रोध आणि लोभ। नरकाची तीन द्वारे सुलभ ।। आत्मनाशाचा होतो लाभ। म्हणून वर्जावी ही द्वारे ।।२१ ।।

या तीन नर्कद्वारांपासून। मुक्त होऊन विकारांपासून ।। कल्याणकारी करी वर्तन । परम गतीला जातो तो ।।२२ ।।

ज्याचे वर्तन शास्त्रविरहित । स्वैर आणि मनसोक्त त्याला सुख सिद्धी नसे लाभत। परम गतीही मिळत नसे ।।२३ ।।

म्हणून कर्तव्याकर्तव्य निश्चित करणे। यासाठी शास्त्रांचा आधार घेणे ।। शास्त्रविहित तेच अनुसरणे । योग्य असे तुझ्यासाठी ।।२४।।

हा सर्व विश्वाचा पसारा । दोन प्रकारांनी भरला सारा । सज्ज्न, त्यांना दुर्जनांचा दरारा । सभोवती दिसतसे ।। सज्जनांच्या आचार विचारांचे । वर्णन दुर्जन व्यवहारांचे ।। श्रेष्ठत्व शास्त्रविहित आचारांचे । दैवासुरसंपद्विभाग योग समाप्त ।।

।। **श्रीकृष्णार्पणमस्तु** ।।

**वा. प. पटवर्धन**
द्वारा सौ. जया धनपाल शहा,
ए -१/११ श्री महावीर नगर,
आयकॉन हास्पिटल समोर, मानपाडा,
डोंबिवली पूर्व ४२१२०१

●●●

**एक यक्षप्रश्न**

**साठी–सत्तरी...**

साठी अथवा ती न जमल्यास, सत्तरी साजरी करण्याची प्रथा आता सार्वत्रिक होत चालली आहे. त्याची सुरुवात केव्हां व कशी झाली आणि ती कोणी केली ?

**''संकष्टी चतुर्थी''  जाती महाराष्ट्रलक्ष्मी**

रिते ताट नैवेद्याचे बघुनि वदे माता
उघड वदन आता कृष्णा उघड वदन आता ।।धृ।।

यशोदेस चिंता भारी श्रीहरी खट्याळ
चतुर्थी व्रता आचरिता सुखी होइ बाळ
म्हणे गणेशासी देवा एक तूच त्राता ।।१ ।।

एक मास नाही केली कृष्णानेहि खोडी
येउनी प्रचीती माता उभय करां जोडी
सिद्ध करी सामग्रीसी पूजण्या अनंता ।।२।।

पूर्ण दिवस भावुक माता नसे काही खात
दिसत शशी मोदक ठेवी देवाच्या घरात
जाइ धूप दीपा घेण्या बाहेरि रहाता ।।३।।

एकला हरी मग पाही मोदकांचे ताट
झडप घालुनीया खाई नैवेद्य क्षणात
विस्मये बुडोनी जाई माय परत येता ।।४ ।।

काय कुठे मोदक गेले कृष्णासि विचारी
दीन मुखे वदता झाला बाल तो मुरारी
म्हणे भक्षिण्यासी येई स्वये विघ्नहर्ता ।।५।।

यशोमती क्रोधे वदली जाणते तुला मी
करोनीच कर्मा दावी स्वतःसी अकर्मी
लावितेच शिक्षा तुजला मोदकांसि खाता।।६।।

अखेरीस निरुपायाने मुख हरीने उघडले
श्रीमुखात त्याची वेळी यशोदेस घडले
विश्वाचे दर्शन दुर्लभ घडे भाग्यवंता ।।७।।

पाहताच मूर्छित होई यशोदा ब्रह्मांड
मंदस्मित करुनी मिटले हरीनेही तोंड
सावध मग केले माते शिरि ठेवुन हस्ता ।।८।।

कृष्णकृपे चक्षुंपुढला अंधकार जाता
उमजले यशोदा माते एक हरी कर्ता
एक तो सवरता एक तोचि हर्ता
एक तो ठरविता एक तोचि दाता
एक तो करविता एक तोचि भोक्ता ।।९ ।।

कृष्णाला रागावून अथवा शिक्षा करून त्याच्या खोड्या काही कमी होत नाहीयेत हे लवकरच यशोदेच्या लक्षात आलं. साम, दाम, दंड, भेद हे सारे उपाय करून यशोदा थकली. अखेरचा उपाय म्हणून तिनं श्रीगजाननाला नवस केला की हे बुद्धिदात्या, माझ्या बाळाला चांगली बुद्धी दे. हे विघ्नहर्त्या, माझ्या बाळावरील येऊ घातलेल्या समस्त अरिष्टांचं निवारण कर. हे लंबोदरा, माझा बाळ अजून लहान आहे, अल्लड आहे. निरागस आणि निष्पाप मनानं जर तो अधिकआगळं बोलला, चालला, वागला तर उदार हृदयानं त्याचे सारे अपराध तू आपल्या पोटात घाल. हे वक्रतुंडा, कृष्णाचे जे अपराध अक्षम्य असतील त्यांची शिक्षा मला कर; पण तो कायम सुखी राहू दे. लोक त्याला त्याच्या चांगल्या कर्मांबद्दल सतत नावाजू देत. त्याचे विचार, आचार आणि उच्चार हे तिन्ही लोकांना आदर्शभूत होऊ देत. एक आई म्हणून मी तुझ्याजवळ हे मागणं मागते आहे. जर हे तू मान्य केलंस तर मी संकष्टी चतुर्थीचं व्रत नित्यनेमानं

आणि अगदी लीन भावानं करत जाईन, पण काहीही करून माझी एवढी एकच इच्छा तू पूर्ण करच कर!

आणि काय आश्चर्य! नवस केल्यापासून चिरंजिवांचं वर्तन एकदम सुधारलं! संपूर्ण एक महिना झाला आणि तसाच गेला; पण ना कृष्णाची एक तक्रार आली, ना त्याला काही सांगावं लागलं, ना ओरडावं लागलं. कृष्ण अगदी गुणी बाळासारखा, अगदी यशोदेला हवा होता तसाच वागू लागला. यशोदा आपल्या नवसाला आलेल्या फळाने थक्क झाली, आनंदित झाली, सद्गदित झाली.

गोकुळवासीयांना मात्र फारच चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं.

संकष्टी चतुर्थीचा दिवस उजाडला. यशोदेनं दिवसभर ना काही खाल्लं, ना काही प्यालं. दिवसभर ती नुसतं गजाननाचं चिंतन करत होती. मनाशी योजत होती की दिवेलागणीची वेळ होण्याआधीच सुग्रास स्वयंपाक करून पूजेनंतर दाखवायचा नैवेद्य सिद्ध ठेवावा. गणेशाला अत्यंत प्रिय असे जे उकडीचे मोदक ते चांगले एकवीस आधीच बाजूला काढून तयार ठेवावेत. चंद्रोदय झाला की शांत मनानं पूजा उरकावी, गणपतीला मोदकांचा नैवेद्य दाखवावा आणि मग स्वतःच्या हातांनी कृष्णाला भरवावं, घरातील सर्वांना वाढावं, उरलंसुरलं स्वतः भक्तिभावानं सेवन करावं...

**'वृंदावन' जाती प्रियलोचना**

या गोपांनो पाहू आपण शोभा वृंदवनातली
लेउन सारे अलंकार जणु सृष्टीदेवी पातली ।।धृ।।

गोकुळामधे आपण सारे किती सुखाने राहिलो
या भूमीच्या अंकावरती संतोषाने खेळलो
सर्वांगाने प्रगती करुनी जीवनि अपुल्या वाढलो
जपुया कायम आपण सारी चित्रे आठवणीतली ।।१।।

गोकुळग्रामी सरपण सारे शीघ्र लयासि जातसे
चारुन गोधन खाद्य पशूंचे अगदी बेचव होतसे
या भूमीला आपण राहुन कळा उतरती येतसे
आता येथील वनसंपत्ती नसे चांगली राहिली।।२।।

सोडुन मोहा या वाड्याचा सारे आपण जाउ या
वनसंपत्ती असे चांगली तेथे आपण राहु या
निसर्गदेवासंगे फिरुनी आनंदाने न्हाउ या
जावे आपण नूतन देशा रीती गोपकुळातली ।।३।।

वृंदावन हे अतीव सुंदर नयनमनोहर स्थान रे
गोधन अपुले करील तेथे अविरत मुक्त विहार रे
गोवर्धन पर्वतशिखरे देती गगना आधार रे
फलपुष्पे वृक्षांच्या योगे वनशोभा ती दाटली ।।४।।

पाउसकाळा अमृतधारा मेघ वर्षती शीतजळे
रम्य जलाशय हंस विहरती शोभति त्यामधुनिकमळे
जागा या जागेसम ऐसी अन्य कुठेही नाढळे
यक्षांना ही भूमी वस्ती करण्याजोगी वाटली।।५।।

मित्रांनो, अपुल्या संसारा गोकुळातुनी आवरा
शकटामध्ये भरुनी घ्यावे सोबत गायी वासरा
करु प्रस्थाना येण्याआधी नभीचा भानु कासरा
जीवनातल्या नवपर्वाची नांदी होऊ घातली ।।६ ।।

कृष्णावर येत असलेली संकटं गोपांच्या मनात घर करून होती. सायंकाल झाल्यावर नंदाच्या वाड्यावर सर्व प्रमुख गोपांनी जमून वेगवेगळ्या विषयांचा ऊहापोह करावा हा गोकुळातला जणू अलिखित नियमच होता. एका

रम्य सायंकाळी अशीच सभा भरली असताना एका वृद्ध आणि भारदस्तशा गोपानं ह्या भीतीला तोंड फोडलं. तो म्हणाला, नंदा, जरी या गवळीवाड्यात आपली अनेक वर्षं अतिशय आनंदात गेली असली, कृष्णासम पुत्ररत्नाचा लाभ तुला याच गोकुळात झाला असला, तरी ही जागा गोपकुलाला विशेष लाभेल असं आम्हांला वाटत नाही.

नाहीतर काय, दुसऱ्या एका प्रतिष्ठित गोपानं त्याची री ओढली; पूतना, शकटासुर इत्यादी भयानक असुरांच्या कचाट्यातून आपण केवळ सुदैवानंच बचावलो. आणि परवाच कोसळलेले ते प्रचंड वृक्ष! एका जरी घरावर अथवा व्यक्तीवर ते कोसळले असते तर काय झालं असतं याची कल्पनाही करवत नाही.

होय रे होय! तिसरा म्हणाला, आता आपण हा गवळीवाडा सोडलेलाच बरा.

पण आता आपणांला गोकुळाची सवय झाल्येय, प्रतिपक्षातील एक जण उठून आपली बाजू मांडू लागला. इथल्या सुखसोयी, यमुनातटाचं सान्निध्य वगैरे गोष्टी दुसऱ्या ठिकाणी आपल्याला मिळतीलच कशावरून? ती जागा कशावरून आपल्याला आणि आपल्या मुलालेकरांना लाभदायक ठरेल? नाहीतर अगदीच आगीतून निघून फुफाट्यात पडलो अशी गत व्हायची.

आणि हो! दुसरा प्रतिवादीही बोलता बोलता भावनेच्या भरात उठून उभा राहिला. गोकुळात आपले दिवस काही क्वचित अपवाद वगळता किती छान चाललेयत. या स्थानाबद्दल आपल्याला किती प्रेम, किती जिव्हाळा निर्माण झालाय. गोकुळ सोडून जायच्या कल्पनेनंच कंठ दाटून येतो.

असे ते वादी आणि प्रतिवादी पक्ष नाना तऱ्हेचं बोलू लागले, एकच कोलाहल करू लागले. तेव्हा नंद उभा राहून सर्वांना शांत करत म्हणाला, मित्रांनो, तुमच्या दोघांच्याही बोलण्यात तथ्य आहे. आपण गोप. योग्य वेळ येताच स्थलांतर करणं ही आपली रीत. तेव्हा आज ना उद्या गोकुळ आपल्याला सोडावं लागेलच याची मला कल्पना आहे. पण ज्या ठिकाणी जायचं ती जागाही अधिक चांगली असायला हवी हा आग्रहसुद्धा काही गैर नाही.

मी स्वतः पंचक्रोशीत गेले काही महिने याच उद्देशानं फिरतोय. सुदैवानं येथून जवळच मला यमुनातटावर एक स्थान सापडलंय. गोवर्धन पर्वताच्या जवळच असलेलं ते स्थान अतिशय निसर्गरम्य आहे. आपल्या गाईगुरांसाठी भरपूर ताजा चारा तिथे उपलब्ध आहे. शेकडो वर्षांपासून एक प्रचंड वटवृक्ष त्या स्थानाच्या अगदी मधोमध उभा आहे. त्याच्याच शेजारी लहान भावासारखा एक भांडीर नामक पिंपळाचा वृक्षदेखील त्या स्थानाच्या शोभेत भर टाकतोय. त्या स्थानाचं नाव आहे वृंदावन...

नंद सांगत होता आणि सारे गोप माना डोलावत कानांत प्राण आणून ऐकत होते...

**प्रसाद औटी**
पुणे

●●●

प्राचीन भारतीय शास्त्रे आणि त्यांविषयीचे ग्रंथ यांसंदर्भात अधिक जागरूकता अलीकडच्या काळात निर्माण होत आहे. अशा ग्रंथांपैकी लोकप्रिय झालेला ग्रंथ म्हणजे 'कौटिलीय अर्थशास्त्र'. कॉर्पोरेट जगतात मान्यता मिळाल्यामुळे या ग्रंथाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. 'चाणक्य मंत्र', 'कॉर्पोरेट चाणक्य' यांसारखी पुस्तके गाजत आहेत. अनेक शतकांनंतरही ज्यातील ज्ञान अबाधित आहे अशा या थोर ग्रंथाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न या लेखमालेद्वारे केला आहे.

या मालिकेतील प्रथम लेखात 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथनामाविषयी सविस्तर विचार केला आहे. 'कौटिलीय अर्थशास्त्र' म्हणजे कौटिल्याने रचलेले अर्थशास्त्र. या ग्रंथनामातील 'अर्थशास्त्र' या शब्दाचा अर्थ अलीकडच्या काळात साधारणतः Economics किंवा पैशाचे शास्त्र असा समजला जातो. परंतु भारतीय शास्त्रपरंपरेत मात्र 'अर्थ' ही संकल्पना अधिक व्यापक आहे. 'अर्थ' शब्दाची व्युत्पत्ती 'अर्थ्यते इति अर्थः ।' म्हणजे 'ज्याची अपेक्षा केली जाते तो अर्थ' अशी आहे. मनुष्याला जे जे प्राप्त करायची इच्छा असते ते सर्व म्हणजे जमीन, धन, धान्य, सुवर्ण, सुख प्राप्तीची विविध साधने या सर्वांचा अंतर्भाव 'अर्थ' या शब्दात होतो.

'अर्थ' या शब्दाचा सर्वांना परिचित आणि परंपरेतही प्रचलित असलेला अर्थ म्हणजे धन. आपल्या ऐहिक इच्छा व अकांक्षांची पूर्तता करण्याचे साधन म्हणजे वैध मार्गाने प्राप्त केलेले धन. याच अर्थाने 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष' या चार पुरुषार्थांपैकी 'अर्थ' हा दुसरा पुरुषार्थ मानला आहे. अशारितीने मनुष्याच्या अर्थविषयक प्रयत्नांचे विवेचन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र.

प्रस्तुत लेखमालेत ज्या ग्रंथाचा विचार केला जाणार आहे, त्या कौटिलीय अर्थशास्त्रातदेखील ग्रंथकार कौटिल्याने अर्थशास्त्राची व्याख्या दिली आहे. कौटिल्य प्रथम 'अर्थ' शब्दाची व्याख्या देतो ती अशी – 'मनुष्याणां वृत्तिः अर्थः ।' मनुष्यवती भूमिः इति अर्थः । अर्थ म्हणजे माणसाच्या उपजीविकेचे साधन म्हाजेच मनुष्यवस्ती असलेला भूप्रदेश. अर्थ म्हणजे धन मनुष्य परिश्रमाने प्राप्त करतो आणि ते प्राप्त करण्याचे साधन प्रामुख्याने भूमी म्हणजे जमीन हे आहे. कारण शेती, खाणी इ. बरेच उद्योग जमिनीवर आधारित असतात. थोडक्यात संपत्ती निर्माण करायची तर भूमी आणि मनुष्याचे श्रम हे दोन मूलभूत घटक आवश्यक असतात. म्हणूनच या दोन घटकोचा अंतर्भाव कौटिल्याने 'अर्थ' या शब्दाच्या व्याख्येत केला आहे.

अर्थ शब्दाची व्याख्या सांगितल्यानंतर 'अर्थशास्त्र' ही संज्ञा कौटिल्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. ती अशी 'तस्याः पृथिव्याः लाभपालनोपायशास्त्रम् अर्थशास्त्रम् ।' मनुष्यांची वस्ती असलेल्या भूमीचा लाभ व त्यानंतर तिचे पालन कसे करावे. याविषयी उपाय सांगणारे शास्त्र

म्हणजे अर्थशास्त्र. या दोन्ही गोष्टी राजा व राजकारण यांच्याशी संबंधित आहेत. म्हणून थोडक्यात सांगायचे तर अर्थशास्त्र हे राजनीतिविषयक शास्त्र आहे. राज्यकारभार पैशाच्या पाठबळाशिवाय चालू शकत नाही. त्यामुळे आजच्या परिभाषेत सांगायचे तर अर्थशास्त्रात Political Science आणि Economics या दोन्ही विषयांचा विचार सामावला आहे.

अर्थशास्त्र या संज्ञेची सविस्तर व्याख्या कौटिल्याने दिली असली तरी केवळ 'अर्थशास्त्र' या संज्ञेवरून त्या शास्त्रातील नेमक्या विषयाचा बोध होत नाही. या शास्त्राचे नेमके स्वरूप व्यक्त करणारी इतर नावेही परंपरेत प्रचलित आहेत. जसे राजशास्त्र, राजनीतिशास्त्र, नीतिशास्त्र, नयशास्त्र, दण्डनीति इ. अर्थशास्त्राच्या या विविध नावांचा थोडक्यात अर्थ पाहू.

**राजशास्त्र** म्हणजे राजाने राज्यकारभार कसा करावा हे सांगणारे शास्त्र.

**राजनीती किंवा राजनीतिशास्त्र** – नीती म्हणजे नेणे किंवा चालवणे. राजनीती म्हणजे राज्यकारभार चालविण्याचे तंत्र सांगणारे शास्त्र. या नावात नीती शब्दाचा केवळ इतकाच अर्थ अभिप्रेत नाही. तर विवेकबुद्धी व नैतिकता यांची सतत जाणीव ठेवून आचरण करणे असा नीती शब्दाचा अर्थ अपेक्षित आहे. म्हणूनच राजनीतिशास्त्र म्हणजे नैतिकतेचे अधिष्ठान ठेवून राज्यकारभार कसा करावा हे सांगणारे शास्त्र.

**नयशास्त्र**– नय म्हणजे नीती. त्यामुळे नयशास्त्राचा अर्थ राजनीती असाच आहे.

**दण्डनीती** – दण्ड शब्दाचे विविध अर्थ अर्थशास्त्रातच सांगितले आहेत. दण्ड म्हणजे कायदा. कायद्यानुसार वर्तन केले नाही तर केले जाणारे शासन म्हणजेही दण्ड. याशिवाय दण्ड शब्दाचा सैन्य असाही अर्थ कौटिल्याने योजलेला दिसतो. सैन्याच्या आधारे अंतर्गत व बाह्य शत्रूंचे दमन करून प्रजेचे रक्षण केले जाते. अशारितीने दण्डनीती या शब्दाने राज्यांतर्गत सुरक्षा, सुव्यवस्था आणि बाह्य शत्रूंचे नियमन कसे करावे हे सांगणारे शास्त्र असा अर्थ व्यक्त होतो.

अर्थशास्त्राच्या या विविध नावांतून सूचित होणाऱ्या सर्व विषयांचा समग्र विचार अर्थशास्त्रात कौटिल्याने केला आहे.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दबके**

●●●

---

(पृष्ठ ११ वरून)....

**'नामसाधना' या विषयावरील काही बोधवाक्ये**

बांधीलकी विसरू नये. चालून आलेली लोकसंग्राहक कार्ये प्रथम कर्तव्य म्हणून त्याने केलीच पाहिजेत असे संत रामदासांचे सांगणे आहे.

२८) गुरू मिळाला नाही, खरा संत भेटला नाही. म्हणून भगवंताची उपासना सुरू करण्याचे लांबवू नये. उपासना प्रगत होऊन ईश्वरभेटीची तळमळ तीव्र झाली की आपला गुरू आपणांस आपण होऊनच भेटतो असा संतांचा अनुभव आहे.

**प्र.सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूज (पूर्व),
मुंबई – ४०००५५
दूरध्वनी – २६६७२२०५

●●●

पूजनाचे अनेक उपचार प्रकार देशकालपरिस्थित्यनुरुप आहेत.

१) पंचोपचार (५) - गन्ध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य असे पाच.

२) दशोप. वरील ५ - पाद्य, अर्घ्य, आचमन, मधुपर्क, पुनराचमन.

३) षोडशोप. (१६) - आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान-आचमन, वस्त्र, यज्ञोपवीत (उपवस्त्र), गन्ध, अक्षत, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य-आचमन, ताम्बूल, दक्षिणा.

४) अष्टादश. (१८) वरील १६ - स्वागत व आभूषण.

५) षड्विंशदुपचार (२६) - आसन, अभ्यज्जन, उद्वर्तन, निरुक्षण, सम्मार्जन, सर्षि, स्नपन, आवाहन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, मधुपर्क, पुनराचमन, यज्ञोपवीतवस्त्र. अलंकार, गन्धपुष्प, धूपदीप, नैवेद्य, ताम्बूल, पुष्पमाला, अनुलेपन, शय्या, चामर, व्यजन, आदर्श, नमस्कार, गायन, वादन, नर्तन, स्तुतिगान, हवन, प्रदक्षिणा, दन्तकाष्ठ आणि विसर्जन.

६) विशेषतः शक्तिपूजेमध्ये चतुःषष्ठ्युपचार शक्तिपूजा (६४) - पाद्य, अर्घ्य, आसन, तैलाभ्यंग, मज्जनशालाप्रवेश, पीठोपदेशन, दिव्यस्नानीय, उद्वर्तन, ऊष्णोदकस्नान, तीर्थाभिषेक, धौतवस्त्र परिमार्जन, अरुणदुकूलधारण, अरुणोत्तरीयधारणम्, आलेप मण्डल प्रदीश, पीठोपदेशनम्, चन्दनादी दिव्यगन्धानुलेपनम्, नानाविधपुष्पार्पण, भूषण ग्रहण, नवमणि मुकुट धारण, चन्द शकल, सीमन्त सिन्दूर, तिलक-रत्न, कालञ्जन, कर्णपाली, नासाभरण, अधरयाक, ग्रथन भूषण, कनकचित्रपदक, महापदक मुक्तावली, एकावली, देवच्छन्दक, केयूरचतुष्टय, वलयावली, उर्मिकावली, काञ्चीदामकटिसूत्र, शोभख्याभरण पार, कटक, रत्ननूपुर, पादांगुलीयक चार ,हातांत क्रमशः अंकुश, पाश, पुण्ड्रेक्षुचाप, पुष्पबाणधारण, माणिक्य पादुका, सिंहासनारोहण, पर्यङ्कोपवेशन, अमृतासवसेवन, आचमनीय, कर्पूर वाटिका, आनन्दोसविलापसहास, मङ्गलार्तिक, श्वेतच्छत्र, चामरद्वय, दर्पण, तालवृन्द, गन्ध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, आचमन, पुनराचमन, ताम्बूल, वंदना.

७) राजोपचार - षोडशोपचारानंतर छत्र, चामर, पादुका, दर्पण.

८) आचरण - कामनाविशेष किंवा स्थापन-व्रतोत्सव आदी पूजापद्धतीचे अनुसारे विविध उपचार अनेक वेळा.

९) मानसोपचार - प्रत्यक्ष वस्तू नसताना एकाग्र चित्ताने वरील विविध उपचारांचे मनाने स्मरण करून आपण अर्पण करीत आहोत ही भावना करून पूजा करणे.

एवढे उपचार सांगण्याचे कारण असे की अनन्त भक्तजन अनन्त प्रकारे तन-मन-धनाने पूजा करत असतात. आपण जरा दोन उपचार जास्त केले की अभिमान होऊ लागतो, मी केवढी

(पृष्ठ ३० वर)

## मेघदूतच का??

**अुत्तम जोशी**

ज्यांच्या लहानपणी मेघदूताशी थोडा तरी संबंध आला असेल त्यांना या काव्याविषयी आकर्षक नक्कीच असेल. परंतु पुढील आयुष्यात संस्कृत श्लोक, सुभाषिते आणि काव्याशी संबंध आला असेलच नाही. परंतु त्याविषयीचे आकर्षण मात्र जसेच्या तसे कायम रहाते. चुकून कधीतरी त्यापैकी काही श्लोक अथवा काव्यपंक्ती कानावर पडल्यास त्या मनात घोळत रहाणे हा एक विरंगुळा असतो.

ज्या प्रज्ञावंतांच्या मनात मेघदूताविषयी प्रेम होते, कुतूहल होते. त्यांनी त्याचा रसास्वाद इतरांनाही घेता यावा म्हणून त्यांनी त्यांचे भाषांतर काव्यरुपाने केले आहे व असा मोह रविंद्रनाथ टागोरांनाही झाला होता आणि त्यांनी अतिशय अुत्कटतेने मेघदूतावर भाष्य केले आहे. कुसुमाग्रजांनीही 'मेघदूता' चा छंदोबद्ध भावानुवाद केला होता. एखादा कलाकृतीचा अनुवाद करण्याची ईच्छा होणे ही तर तींच्या थोरवीची, लोकप्रियतेची कसोटी मानली तर 'मेघदूत' हे संस्कृत मधील सर्वात लोकप्रिय काव्य म्हणावे लागेल. मराठीतल्या अनेक कवींना, लेखकांना असा अनुवाद करून बघावासी वाटला त्या सर्वांचे लेखन प्रत्येकाने वाचले असेलच असे नाही. पण 'मेघदूत' या काव्याविषयीची ओढ अथवा प्रेम हे प्रत्येक सुजाण वाचकाचे मनात आहेच आहे.

मेघांनी हे गगन भरतां गाठ आषाढमासी
होई पर्युत्सुक विकल तो कान एकान्तवासी
तन्निश्वास श्रवुनि, रिझवी कोण त्याच्या जीवासी?
मन्दाकान्ता ललित कविता कालीदासी विलासी

माधव ज्युलियन् यांचे या काव्याविषयी हे विचार अनेक गोष्टी सांगुन जातात. प्रत्येकाने मनाला भुरळ घालण्याचे, भारावून टाकण्याचे या काव्याचे सामर्थ्य शब्दातीत आहे.

'अनुवाद करून बघणे हा मूळ कलाकृतीचा अधिक अुत्कटपणे रसास्वाद घेण्याचा एक सुंदर मार्ग आहे.' असे शांताबाई शेळक यांनी मेघदूताच्या केलेल्या अनुवादाचे प्रस्तावनेत म्हटले आहे. त्या पुढे म्हणतात. मेघदूताचे दर्शन न घेतलेल्या वाचकांना या अनुवादामुळे मूळच्या संस्कृत काव्याचे वाचन करण्याची उत्सुकता निर्माण व्हावी एवढीच माझी नम्र अपेक्षा आहे.

आणि हाच हेतू मनांत बाळगून आम्ही कार्यक्रम आयोजित केला आहे.

**अुत्तम जोशी**

●●●



प्रत्येक सांसारिकाच्या आयुष्यात कधी ना कधी त्याला परमात्म्याची कळकळीने आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्याच्या कृपेची अथवा आशीर्वादाची जरूर तीव्रतेने भासल्याशिवाय राहत नाही. विशेषतः जगातील दुःखाची प्रखरतेने अनुभूती झाल्यावर, माणसाला ईश्वरचरणांची आस लागते. सर्वसाधारणपणे दुःखाने गांजलेला जीव लवकर अध्यात्माकडे वळतो असे दिसते. त्यापेक्षा वाईट परिस्थिती असते ती सर्व सुखसमृद्धी असून ज्याला मनाची शांती, समाधान नाही त्याची. तो अगतिक होऊन त्या सर्वशक्तिमान ईश्वराकडे या सर्वातून कायमचे सुटण्यासाठी कृपायाचना करू लागतो. समाजातील गृहस्थाश्रमी व्यक्तीचे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जरूर असते ती साधनेची. **मनःशांतीसाठी साधना**.

**साधना म्हणजे मन व बुद्धीची शुद्धि प्रक्रिया**. या क्रियेचा वेग ईश्वरप्राप्तीच्या इच्छेच्या तीव्रतेच्या प्रमाणात असतो असे सामान्यतः म्हणता येईल. शारीरिक व्याधीच्या तीव्रतेच्या प्रमाणात माणूस त्यावर उपाययोजना करतो, म्हणजे दुःख तीव्र असल्यास डॉक्टरकडे जाऊन जालीम औषधाची याचना करतो, त्याचप्रमाणे संसारात मानसिक अथवा शारीरिक दाह अतितीव्र झाल्यास साधना जास्त प्रखरतेने होण्याची शक्यता असते.

या सर्वाचा आपल्यासारख्या सामान्य गृहस्थाश्रमी माणसाच्या दृष्टीने विचार करावयचा झाल्यास, आपल्यासाठी ही साधना काय स्वरूपाची असल्यास आपल्याला फलदायी ठरेल हे पाहायला हवे. थोडक्यात आयुष्यात कसे वागल्याने आपल्याला मनःशांती, समाधान मिळेल ते पाहायला हवे. माणसाला प्रथमतः इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा स्वतःवर, स्वतःच्या मनावर ताबा मिळवणे जरूर असते. स्वतःच्या मनावर कोणत्याही प्रकारची जोर–जबरदस्ती न करता त्याचा ताबा मिळवणे, स्वमनाचा स्वैराचार बंद करणे, हा ह्या साधनेचा गाभा आहे. मनाने एखाद्या एकनिष्ठ आज्ञाधारक सेवकाप्रमाणे नतमस्तक होऊन उभे ठाकावे व विवेकबुद्धीने दिलेल्या आज्ञेचे पालन करावे. सुरुवातीला माणसाच्या बुद्धीला जे पटते, बुद्धी ज्याला अंगीकारते, त्याचा स्वीकार मन करतेच असे नाही. याचे कारण त्यासाठी त्याग जरूर असतो, तो करण्याची मनाची तयारी नसते. माणसाची आसक्ती, हा या त्यागाच्या आड येतात. तामसी वृत्तीने, आसक्तीने भरलेले मन त्याग सहन करू शकत नाही. सुरुवातीच्या काळात, माणसाला जनसामान्यांत राहून स्वतःचे मन शांत, निर्मळ करणे अतिशय कठीण भासते व ते तसे असतेही. सुरुवातीला माणसाचे मन हे रानटी व उद्दाम अश्वासारखे असते, त्यावर काबू करणे हे किती कठीण याची आपण कल्पना करू शकतो. अशा मनाला चुचकारून, वेळ पडल्यास फटकारून स्वाधीन करण्यासाठी, आपल्या संपूर्ण नियंत्रणाखाली आणण्यासाठी, मनाबरोबर एकांतवासाची जरूर लागते. मनाला शाश्वताची जाणीव करून देणे व ती त्याला बिनशर्त मान्य करावयाला लावणे हे जिकिरीचे, पण कलात्मक काम आहे. लहान मुलाला आपलेसे करण्यासाठी, त्याचा सहवास जसा अपरिहार्य असतो, तसेच मनाचे आहे.

त्याला वळवण्यासाठी वेळप्रसंगी एकांतातल्या हितगुजाची जरूर लागते. सामान्य माणसासाठी मनाची एकाग्रता, त्याच्यातील 'मी' चे संपूर्ण विसर्जन, मनाचा निर्मळपणा, संपूर्ण अद्वैतभाव, परमेश्वरावर श्रद्धापूर्ण प्रेम, ईश्वरावरील निस्सीम निष्ठा आणि हातून घडणाऱ्या समस्त कर्माबद्दल संपूर्ण निरपेक्षता, अनासक्तता अशा अनेक गोष्टी त्याच्या साधनेचे 'फलित' व्हावे लागते. मन आणि शरीराची एकतरता (ट्यूनिंग) हे यासाठी अपरिहार्य आहे. या सर्व गोष्टी साधनेतून मिळवताना सातत्य व शिस्त साधकाच्या अंगी बाणवली जाते. एकाग्रता, सातत्य व शिस्त हे साधनेचे फल आहे. वरील नमूद केलेल्या गोष्टी जसजशा साधकाला अवगत होऊ लागतात, तसतसे साधकाला आपल्या साधनेतील प्रगतीचे प्रमाण मिळत जाते.

पण या सर्व गोष्टी मिळण्यासाठी आपल्यासारख्या सामान्य संसारी माणसाने काय करावे म्हणजे त्याला मनःशांती आणि समाधान प्राप्त होऊ शकेल? व्यवहारी माणसाने यात थोडा व्यवहार आणून त्याचा निकराने अवलंब केल्यास बरेच काही साधता येईल असे वाटते, व्यवहारात आपल्या वरिष्ठाला खूश करण्यासाठी आपण काय करतो, तर त्याचा पूर्ण विश्वास संपादन करण्यासाठी जसे वागायला पाहिजे तसे वागण्याचा कसोशीने प्रयत्न करतो. त्याला न आवडणाऱ्या गोष्टी करणे कटाक्षाने टाळतो. असेच आपण परमेश्वराच्या बाबतीत करून बघायला काय हरकत आहे? आपण आपल्या आयुष्यात असलेली परिस्थिती बदलण्यासाठी, म्हणजे ती व्यवहारिकदृष्ट्या अधिक चांगली करण्यासाठी जरूर प्रयत्नशील असले पाहिजे, परंतू तसे करत असताना दुसऱ्याचे नुकसान करणे अथवा त्याला क्लेश न देणे असा आपला आचार ठेवला तर ते आपल्या वरिष्ठाला (परमेश्वराला) नक्कीच आवडेल. आपली वाजवी नड भागवल्यावर, आपल्याकडे असलेल्या भागापैकी थोडासा भाग जर अडचणीत असलेल्यांसाठी खर्ची घातला तर परमेश्वराला निश्चितच आवडेल, नाही का? कोणाहीबद्दल राग अथवा सूडबुद्धी न ठेवणे हाही यातलाच एक भाग, हेच वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आपल्या अंगी क्षमाशीलता बाणवणे, तसा प्रामाणिकपणे प्रयत्न करणे.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आज जे काही आपल्यात आहे ती त्या परमेश्वराचीच कृपा आहे याचे भान असणे. अनेक लोक या बाबतीत असे म्हणतील की, आज जे काही माझ्याकडे आहे ते सर्व माझ्या श्रमाने मिळवलेले आहे. जगात असे अनेक लोक असतील जे आपल्यापेक्षा जास्त श्रमिक व व्यावहारिकदृष्ट्या आपल्यापेक्षाही लायक असतील, पण जे आपल्याला मिळाले त्याच्या शतांशानेही त्यांच्याकडे नसेल, याला उत्तर मिळत नाही. असो. हा वादाचा मुद्दा होऊ शकतो, याला पूर्णविराम श्रद्धेचाच देता येईल. थोडक्यात, या मनःशांतीसाठी आणि समाधानप्राप्तीसाठी सद्विवेक, क्षमाशीलता, सद्भाव, प्रेम, श्रद्धा या गोष्टी आपल्या अंगी बाणवण्याचा प्रयत्न हीच आपल्यासाठी मनःशांती आणि अविनाशी समाधान मिळवण्यासाठीची साधना आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

साधनेचे अनेक वेगवेगळे मार्ग आहेत. त्यांपैकी कर्माचरण, भक्तिमार्ग,वगैरे आपणां सामान्यांसाठी आहेत. ज्याला जो सोपा, सोईस्कर

अगर जवळचा वाटेल तो त्याने स्वीकारावा. मार्ग कोणताही अवलंबला तरी त्याचे अंतिम उद्दिष्ट एकच आहे. आपण जसे शरीरशुद्धीसाठी प्रथम पोट साफ करतो, त्याप्रमाणे या साधनेत मन स्वच्छ करणे, निकोप करणे, निर्विकार करणे, एकाग्र करणे जरूर आहे. मन कलुषित करणारे तामसी विचार मनातून दूर करणे, ज्याला इंग्रजीत 'डिटॉक्सिफिकेशन' असे म्हटल जाते, अपरिहार्य होय. मन सुदृढ झाल्याशिवाय ते वाईट विचारांचा प्रतिकार करू शकत नाही, ज्याचा परिणाम मनाच्या एकाग्रतेवर प्रामुख्याने होतो. ध्यानधारणा अथवा नामस्मरण या मार्गाद्वारे आपण मनाची शांती, एकाग्रता ह्या गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करत असतो. आराध्यदैवताचे स्मरण करताना प्रयत्न असतो तो मनातून इतर विचार संपूर्णपणे बाहेर काढून फक्त आराध्यावर मन केन्द्रित करणे हाच. मन एकाग्र करणे, त्याला इतरत्र सैरभैर होऊ न देणे हा मूळ उद्देश असतो व असला पाहिजे.

साधना ही पुस्तक वाचून, संथा घेऊन अथवा तत्सम प्रकाराने होत नाही. हा अनुभूतीचा भाग आहे. जसे दुसऱ्याने व्यायाम केल्याने आपले शरीर सुदृढ होऊ शकत नाही, दुसऱ्याने औषध घेतल्याने आपण रोगमुक्त होत नाही, त्याचप्रमाणे साधनेचे फलित स्वार्जित असावे लागते. साधनेत गुरू मार्ग निर्देशित करतो, पण त्यावर मार्गक्रमणा आपल्यालाच करावी लागते. **साधना म्हणजे बुद्धी व मनात अंतर्बाह्यबदल घडण्याची क्रिया, बुद्धी आणि मनाचा मुळापासून संपूर्ण कायापालट,** मुळापासून म्हणण्याचे कारण म्हणजे, हा कायापालट बळजबरीने लादलेला नव्हे तर, **मनाने व बुद्धीने स्वेच्छेने अंगीकारलेला.**

साधनाकालात वाढत जाणारी मनाची शांतता, समाधान, विरक्ती आणि ईश्वरचरणाची आस आपल्याला चिंतामुक्त करून संपूर्ण समाधान देते. या पातळीवर पोहोचल्यावर साधनेत स्थिरता येण्याची शक्यता असते. साधनेची ही विशिष्ट पातळी ओलांडल्यावर साधकाला काळ, स्थळ अथवा आजूबाजूची परिस्थिती यांची तमा वाटेनाशी होते, कारण ह्या गोष्टींचा त्याच्या साधनेवर, मनावर यत्किंचितही परिणाम होत नाही. त्याच्या मनाने व बुद्धीने अलिप्ततेची इतकी उच्च पातळी गाठलेली असते की, तो सर्वासमवेत असूनही संपूर्णपणे अलिप्त असतो, संपूर्ण बंधनमुक्तावस्थेत. आपल्या शरीराच्या अस्तित्वाचे, परिस्थितीचे त्याला भानच उरत नाही. साधकाचे परमात्म्याशी अद्वैत झालेले असत. तो सदैव ब्रह्मानंदाच्या सागरात विहार करत असतो. आनंदाचा आविष्कार 'स्मित' नसून, साश्रुनयन असतात याची अनुभूती आपल्याला अनेकदा येते. ताटातूट झालेल्या माता-अपत्याच्या भेटीच्या प्रसंगी मातेच्या व लेकराच्या चेहऱ्यावर स्मित नसून, डोळयांत आनंदाश्रू आढळतात. मला वाटते, 'परमात्म्याशी अद्वैतावस्था' हा कोणत्याही साधकाच्या साधनेतला 'परमोच्च बिंदू' असावा.

सर्व श्रीचरणार्पणम् अस्तु.

**दिलीप भाटवडेकर**
२१५, राजा राममोहन मार्ग,
१ ला मजला, सर भालचंद्र बिल्डिंग,
गिरगांव, मुंबई - ४०० ००४
दूरध्वनी : २३८५८८७५

●●●

## निरंतर सुखाची गुरुकिल्ली

**विंग कमांडर वसंत नारायण देशमुख**
(निवृत्त)

१. सर्वप्रथम "सुखमय स्थिती व सुखाचा अभाव" यांच्यातले अंतर पाहू या. जेव्हा चांगले आरोग्य असलेला व कोणतेही शारीरिक दुःख नसलेला मनुष्य गाढ झोप झाल्यावर आपोआप जागा होतो तेव्हा त्याच्या मनाची स्थिती कशी असते? त्याचे मन अत्यंत शांत, स्वच्छ व अगदी कोरे म्हणजे कोणत्याही विचारांनी भरलेले नसते. त्याने कोणतेही प्रयत्न केल्याविना ही त्याच्या मनाची स्थिती असते कारण हीच आपल्या मनाची नैसर्गिक मूळची स्थिती असते. जेव्हा मनुष्य विचार करू लागतो तेव्हा त्रासदायक गोष्टींच्या विचारानेही परिस्थिती बिघडते व मनात दुःखाचा शिरकाव व्हायला आरंभ होतो. म्हणजेच सुखाचा अभाव हा केवळ कारणपरत्वेच असतो. आपल्या मनाची मूळची निरंतर निरामय सुखमय स्थिती बिघडवणारी कारणे जर आपण टाळू शकलो तर आपले मन निरंतर निरामय आनंदात राहू शकेल. ही स्थिती सतत ठेवू शकणाऱ्या गुरुकिल्लीकडे आपण आता वळू. ही गुरुकिल्ली सर्वस्वी श्रीमद्भगवद्गीतेवर आधारित आहे व अखिल मानवजातीला लागू आहे.

२. गीता अध्याय १० वा, श्लोक ६ वा ह्यात भगवान श्रीकृष्ण सांगतात की, सात ऋषी, त्यांच्या पूर्वीचे चार ऋषी तसेच सर्व मनू, ज्यांनी ही सर्व सृष्टी निर्माण केली ते सर्व माझेच मानसिक भाव म्हणजेच केवळ विचारच आहेत. आपण जसे विचारांत वेगवेगळ्या व्यक्तींची वा प्राण्यांची कल्पना करीतो, तेव्हा त्या व्यक्ती वा प्राणी काही प्रत्यक्ष आपल्यासमोर अस्तित्वात नसतात. तशीच संपूर्ण सृष्टी ही भगवान श्रीकृष्णांची केवळ मानसिक विचारधारा आहे, तिला प्रत्यक्ष अस्तित्वच नाही. पण आपल्याला तिचे अस्तित्व भासते कारण आपणही त्याच काल्पनिक सृष्टीचा एक भाग आहोत. तसेच आपण जर मनात चार व्यक्तींची कल्पना केली तर ती प्रत्येक व्यक्ती म्हणजे आपला विचार म्हणजे आपले संपूर्ण मनच असते. हीच स्थिती भगवान श्रीकृष्णांची आहे म्हणूनच ते अध्याय ९ वा, श्लोक १६ वा ह्यात असे सांगतात की, यज्ञ मी आहे, त्यात टाकलेल्या समिधा मी आहे, त्यात घातलेले तूप, तसेच जाळणारा अग्नी, त्यात जळणारे लाकूड व यज्ञात निर्माण होणारी राखही मीच आहे. तसेच त्या वेळी म्हटले जाणारे मंत्रही मीच आहे. म्हणूनच ईश्वर सर्वत्र भरलेला नसून सर्व काही ईश्वरच आहे. तसेच ईश्वराचे हे प्रत्येक रूप म्हणजे स्वतः संपूर्ण ईश्वरच आहे. हे याज्ञवल्क्य उपनिषदातील ईश्वराचे वर्णन करणारा एक श्लोक सांगतो. ह्या श्लोकानुसार, मूळ सत्य म्हणजेच ईश्वर हा पूर्ण आहे. ही सर्व सृष्टी पूर्ण आहे. ही पूर्ण सृष्टी पूर्ण ईश्वरातून केली आहे. पूर्ण ईश्वरातून पूर्ण सृष्टी काढल्यावर उरलेला ईश्वरही पूर्णच आहे. म्हणजेच ह्या दोघांतही काहीच वेगळेपण नाही. म्हणजेच दोघेही जरी वेगळे दिसत असले तरी एकच आहेत. म्हणजेच सारी सृष्टी ही अगदी मृगजळासारखीच आहे. मृगजळ आपल्याला दिसत तर असतेच. पण प्रत्यक्ष जवळ गेले की दिसत नाही कारण तो एक भासच असतो. म्हणूनच म्हणतात, 'दिसते तसे नसते म्हणूनच सारे जग चकते'.

३. आता एखादा उत्तम कादंबरीकार कादंबरीची रचना कशी करतो ते पाहू. तो प्रथम तिचा आराखडा करतो. तिचा शेवट कसा करावयाचा

तेही निश्चित करतो. मगच आपल्या कल्पनाशक्तीला पूर्ण वाव देतो व कादंबरी पूर्ण करतो. (म्हणजेच त्याला) अथपासून इतिपर्यंत कथेची माहिती असते. तीच गोष्ट ह्या परमेश्वराची आहे. तोच ह्या सर्व सृष्टीच्या नाट्याचा लेखक, दिग्दर्शक व एकमेव नटही आहे व आपले एकच पात्री, पण असंख्यरूपी नाट्य चालवीत असतो. हेच त्याने ७ व्या अध्यायातील २६ व्या श्लोकांत सांगितले आहे. तो म्हणतो, 'ह्या सृष्टीच्या आरंभी कोण कोण होते व त्यांनी काय केले वा नाही केले ते सर्व मी जाणतो. आत्ता ह्या क्षणी जगात सर्वत्र कोण कोण आहेत व काय करीत आहेत तेही मी जाणतो. तसेच भविष्यात अगदी सृष्टीच्या अंतापर्यंत कोण कोण असेल व काय करीत असेल तेही मी जाणतो. पण मला मात्र कोणीही जाणत नाही.' ह्याचा आपण जरा खोलात जाऊन विचार करू. कल्पना करू की भगवान श्रीकृष्ण अत्यंत बुद्धिमान आहेत त्यामुळे त्यांना सबंध सृष्टीचा प्रारंभापासूनचा सर्व इतिहास मुखोद्गत आहे म्हणजेच आधी असलेल्या सर्व प्राणिमात्रांची संपूर्ण माहिती त्यांना आहे. तसेच आपण अशीही कल्पना करू की त्यांच्याकडे उत्तम अशी माहिती तंत्रज्ञानाची अद्ययावत यंत्रणा आहे, जी त्यांना क्षणोक्षणी सगळीकडची सर्व माहिती पुरवीत आहे म्हणजेच त्यावेळी असलेली सर्व माणसे कुठे आहेत व काय करीत आहेत हे त्यांना माहिती होत असते. इथपर्यंत कल्पनाशक्तीचे आपल्याला साहाय्य होते. पण भविष्यकाळात पुढे होणाऱ्या प्राणिमात्रांची माहिती त्यांना कशी असू शकते? ह्या प्रश्नाचे एकच उत्तर असू शकते व ते म्हणजे 'त्यांनीच सर्व सृष्टीचा सबंध भविष्याचा पूर्ण आराखडा आधीच ठरवून ठेवला आहे' म्हणजेच ब्रह्मदेवाचे रूप घेऊन त्यांनी सर्व जगाचे 'ब्रह्मलिखित' आधीच लिहून ठेवले आहे व ह्या गोष्टीला दुसरा काही पर्यायच नसतो कारण ह्या योजनेत वेगळेपण आणू शकेल असे दुसरे व्यक्तिमत्त्वच अस्तित्वात नाही. हे असे असण्याचे कारण म्हणजे सर्व काही तेच असतात, अगदी संपूर्णपणे तेच असतात व त्यांनीच सर्व योजना केलेली असते त्या कादंबरीकाराप्रमाणेच. ह्याचा अर्थ आपण जेव्हा काही अत्यंत गुप्त योजना आखतो जी दुसऱ्या कोणालाही माहिती नसते. पण ती श्रीकृष्णांना माहिती असते कारण आपण अशी गुप्त योजना आखू अशी त्यांचीच योजना असते. ह्याचे कारणही त्यांनी अध्याय १८ वा, श्लोक ६१ वा ह्यात दिले आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, 'सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत राहून मी त्यांना एखाद्या यांत्रिक चक्रावर बसविल्याप्रमाणे फिरवीत असतो, भोवंडीत असतो. म्हणजेच त्यांना बुद्धीही मीच देत असतो व कृतीही मीच करवून घेत असतो. पण असे असले तरी त्यांच्यात जो अहंकार असतो त्यामुळे आपणच सर्व काही आपल्या स्वेच्छेनेच करीत आहोत असे त्यांना वाटत असते. हे सांगितले आहे, ३ ऱ्या अध्यायातील २७ व्या श्लोकात. ते म्हणतात, 'जरी सर्व काही मनुष्याची प्रकृतीच करवीत असते तरी अहंकारामुळे आपणच कर्ते आहोत, काय करावयाचे ते आपणच ठरवितो व त्याप्रमाणे करतो (म्हणजेच आपल्याला कर्मस्वातंत्र्य आहे) असे माणसाला वाटत असते. ह्यामुळेच मनुष्य सुखदुःखाचा धनी होतो.

४. मनाची शांती ढळवणारे एक नित्यआढळणारे कारण म्हणजे विश्वासू मित्राने तुमचे पैसे बुडविणे. त्याचे कारण पाहू या. आता तुम्हांला पैशाची आवश्यकता आहे पण तुम्हांला त्याच्याकडून पैसे

मिळत नाहीत. त्याने असे का केले हा प्रश्न तुम्हांला सतावीत असतो. ह्याच ठिकाणी वरच्या परिच्छेदांत आपण घेतलेली माहिती आपल्या साहाय्याला येऊ शकते. आपण तुमच्या मित्राने विश्वासघात केला असे म्हणून त्याच्याकडे त्याच्या कृतीचे कर्तृत्व देऊन त्याला त्यासाठी दोष देतो. पण त्याला हे करण्याची बुद्धी देऊन हे त्याच्याकडून बुद्धिबळाच्या प्याद्याप्रमाणे करवून घेणारा भगवान श्रीकृष्णच आहे हे भगवान श्रीकृष्णच आपल्याला आपल्या अहंकाराने विसरायला लावतो म्हणजे त्याचे वैश्विक नाटक चालू राहते. मुळात आपले पैसे हाच भ्रम त्याने आपल्यात उत्पन्न केलेला असतो. पैसे श्रीकृष्णाने दिले व त्यानेच ते नेले हे जर ध्यानात ठेवले तर आपपर भावच नष्ट होईल. पण हे होईल जर तसे भगवान श्रीकृष्णांनी योजिले तरच. मग ह्यावर उपाय कोणता? तो उपाय म्हणजे आपल्याला कर्मस्वातंत्र्य नसतानाही ते आहे असे गृहीत धरून त्याचा उपयोग मित्राशी भांडण्यात न करता आपली अडचण निवारण करणारा अन्य उपाय पाहावयाचा. याचाच एक भाग म्हणून मित्राला पैसे परत करण्याची विनंतीही करायला नकार नाही. पण त्याच्याशी भांडून आधीच बिघडलेली मानसिक शांती अधिकच बिघडेल. बरे, त्याच्याशी शत्रुत्वही धरू नये. सारांश हाच की इतर कारणांनी आपली मानसिक शांती नष्ट होत असते त्यात आपणच भर घालू नये. (पण ह्याचा अर्थ असा नाही की एखादी वाईट घटना तुमच्यासमोरच घडत असेल तर परमेश्वरी इच्छा म्हणून हांत झटकावे. त्या वेळी आपल्या प्राणांचीही काळजी न करता ती घटना थांबविण्याचा प्रयत्न करावा.) आणि हे सहज करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आपले कार्यालयीन काम वगळून इतर सर्वच वैयक्तिक विषयांत घडलेल्या अप्रिय घटना करणाऱ्या कोणालाही कधीही 'त्याने एखादी गोष्ट का केली?' हा प्रश्न कधीही विचारू नका कारण त्या घटनेचे कर्तृत्व केवळ भगवान श्रीकृष्णांकडेच असते. आणि हीच आहे निरंतर निरामय सुखाची गुरुकिल्ली. ही वृत्ती एकदा तुम्ही अथक प्रयत्न करून अंगीकारलीत की तुमच्या मनातले सर्वच संशय नष्ट होतील. 'जे घडले ते परमेश्वराने योजल्याप्रमाणेच घडले व दुसरे काही घडण्याचा प्रश्नच नाही' हे ध्यानात ठेवले म्हणजे 'असे केले असते तर तसे झाले असते', हा अपयश आल्यावर आपल्याला सतावणारा जो विचार असतो तोच ह्या वृत्तीने नष्ट होईल. परिणामी घडलेल्या अप्रिय घटना आपोआपच विसरल्या जातील व जीवनात सर्वत्र आनंदच आढळेल. म्हणूनच आपल्या वैयक्तिक जीवनातून कोणत्याही गोष्टीविषयी, 'ती का घडली?' हा विचारच पूर्णपणे काढून टाका. ह्याचा अर्थ कारणे शोधू नका असा नाही. पण त्या चौकस बुद्धीचा उपयोग कोणालाही दोष देण्यासाठी करू नका. तर सकारात्मक हेतू ठेवा. ह्याने तुमच्या मनाचे समाधान तर होईलच व मनाची शांतताही ढळणार नाही. हा 'रामबाणच' आहे, पण तो उपयोगात आणला जाईल तसे आपले ब्रह्मलिखित असेल तरच. आताच ब्रह्मलिखित हे आहे की ही 'सुखाची गुरुकिल्ली' प्रथम सुचली व ती तुमच्या हातांत देण्याची बुद्धी झाली व तसे करूनही झाले.

**विंग कमांडर वसंत नारायण देशमुख** (निवृत्त)
ए-२, श्रीराम व्हाईट हाउस, ६ वा मेन,
१५ वा क्रॉस, आर. टी. नगर, बेंगळूरू,
कर्नाटक राज्य-५६००३२
भमणध्वनी क्र. ९६८६५४५०९३

## ''सद्धर्म'' सुवर्ण महोत्सव
## वर्ष २०१४-२०१५

सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या ''सद्धर्म'' त्रैमासिकाचा पहिला अंक १५ ऑगस्ट १९६५ ला प्रसिद्ध झाला होता. **१५ ऑगस्ट २०१५ ला यास ५० वर्षे पूर्ण होत आहेत.** या निमित्य २०१४-२०१५ हे वर्षं सुवर्ण महोत्सवी वर्षं म्हणून साजरे केले जाणार आहे. यासाठी ''सद्धर्म'' चे सर्व देणगीदार, वाचक, हितचिंतक यांना अशी विनंती वजा आवाहन आहे की त्यांनी या बाबत आपल्या सूचना, कल्पना लवकरात लवकर दूरध्वनी व पत्राने कळवाव्यात. म्हणजे योग्य, व्यवहार्य सूचना, कल्पनांचा विचार करता येईल.

''सुर्वण महोत्सवी'' वर्षाची सुरवात म्हणून फेब्रुवारी-मार्च २०१४ मध्ये, ''संस्कृत भाषा जी सुवर्णरत्नांची खाण आहे. त्या खाणीतील ''कोहिनूर हिरा'' म्हणचे त्याचे 'मेघदूत' हा काव्याचा मुकुटमणीच म्हणावा लागेल'', असे मत मांडणाऱ्या प्रसिध्द निवेदिका सौ. धनश्री लेले यांचा **कालिदासाचे ''मेघदूत - आस्वादक रसग्रहण'' हा कार्यक्रम दिनांक १८, १९, २०, २१ मार्च (मंगळवार ते शुक्रवार), सायं. ७.०० ते ९.०० या वेळात ''सहयोग मंदिर'', सहयोग मंदिर पथ, घंटाळी, ठाणे**, येथे ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. सर्व देणगीदार, वाचक, हितचिंतक व रसिक नागरिकांस विनामूल्यप्रवेश आहे. यासाठी सद्धर्म प्रकाशना कडून आपणा सर्वांना हार्दिक निमंत्रण आहे व **आपण इतर सर्वांस सद्धर्म प्रकाशकांतर्फे हार्दिक निमंत्रण द्यावे ही विनंती आहे.**

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रवास, वाहतूक , संदेशवहन सहज सुकर व सोपे झाले आहे. त्यामुळे आजपासून सुमारे २१ शतकापूर्वी उपलब्ध प्रवास साधने व संदेशवहन साधने कशी असतील याची कल्पना करणे आजच्या पिढीस समजण्यास अवघड जाणार हे नक्की. पण एकदा ते समजून घेतले की महाकवीकुलगुरू कालिदासाच्या मेघदूत काव्याचे महत्व सहज लक्षात येईल. कालिदास प्रतिभावंत महाकवी तर होताच. पण त्याने त्याच्या लिखाणात दिलेल्या उपमा अत्यंत समर्पक होत्या. त्याच्या रसास्वादासाठी त्या समजून घेणे महत्वाचे ठरते. या उपक्रमामुळे कालिदासाच्या मेघदूताचा आजच्या तरुणाईला परिचय होईल व महिमा नक्कीच समजून घेता येईल असा विश्वास वाटतो.

●●●

तिरश्चामपि चारातिसमवाय समेयुषाम ।
यतः सुग्रीवमुख्यानां यस्तमुग्रं नमाम्यहम् ।।
सकृदेव प्रपन्नाय विशिष्टामैरयच्छ्रियम ।
बिभीषणायाब्धितटे यस्त वीरं नमाम्यहम् ।।
यो महान पूजितो व्यापी महान वै करुणामृतं ।
श्रुतं येन जटायोश्च महाविष्णु नमाम्यहम् ।।
तेजसाप्यायिता यस्य ज्वलन्ति ज्वलनादयः ।
प्रकाशते स्वतन्त्रो यस्तं ज्वलन्तं नमाम्यहम् ।।
सर्वतोमुखता येत लीलया दर्शिता रणे ।
रक्षसां स्वरमुख्यानां तं वन्दे सर्वतोमुखम् ।।
नृभावं यः प्रपन्नानां हिनस्ति च तथा नृषु ।
सिंहः सत्त्वेष्विवोत्कृष्टस्तं नृसिंह नमाम्यहम् ।।
यस्माद्विभ्यति वातार्कज्वलनेन्द्राः समृत्यवः ।
भियं तनोति पापानां भीषणं तं नमाम्यहम् ।।
परस्य योग्यतापेक्षोरहितो नित्यमङ्गलम ।
ददात्येव निजोदार्याद्यस्तं भद्रं नमाम्यहम् ।।
यो मृत्युं निजदासानां नाशयत्यखिलेष्टदः ।
तत्रोदाहतलये व्याधां मृत्यमृत्युं नमाम्यहम् ।।
यत्पादपद्मप्रणतो भवत्युत्तमपूरुषः ।
तमजं सर्वदेवानां नमनीयं नमाम्यहम् ।।
अहंभावं समुत्सृज्य दास्यैनैव रघूत्तमम् ।
भजेऽहं प्रत्यहं रामं ससीतं सहलक्ष्मणम् ।।
नित्यं श्रीरामभक्तस्य किंकरा यमकिंकरा ।
शिवमय्यो दिशस्तस्य सिद्धयतस्य दासिकाः ।।
इमं हनूमता प्रोक्तं मन्त्रराजात्मकं स्तवम् ।
पठत्यनुदिनं यस्तु स रामे भक्तिमान भवेत् ।।

**भावार्थ**

आपला मुख्य शत्रू रावणाच्या विनाशासाठी ज्यांनी कपिराज सुग्रीवादी तिर्यक योनीतील वानरअस्वलादींचे सैन्यदल संघटित करून (व त्यांना युद्धकलेचे प्रशिक्षण देऊन सुप्रबुद्ध करून) लंकेवर विजय प्राप्त केला त्या अतिउग्र भगवान श्रीरामांना मी नमस्कार करतो. समुद्रकिनारी आलेल्या बिभीषणाने एकदाच ''मी आपणास शरण आलो आहे'' असे म्हटले, त्याला लंकेचे राज्य व अपार वैभव देणाऱ्या महावीर श्रीरामांना मी नमस्कार करतो. जो सर्वव्यापक आहे, सर्वांहून महान आहे व त्याची पूजा देवता, ऋषिमुनी करतात तसेच जो महान कृपासुधेचे मूर्तिमंत स्वरूप आहे, ज्यांनी आपल्या कृपामृतसिंचनाने जटायूंना मुक्ती दिली त्या महाविष्णुस्वरूप भगवान श्रीरामांना मी नमस्कार करतो. अग्नी, चंद्र, सूर्य इ. तेजस्वी तारकापुंज ज्याच्या तेजानेच प्रज्वलित व प्रकाशित होतात आणि जो स्वतः आपल्याच तेजाने प्रकाशित (स्वयंप्रकाशी) आहे त्या स्वयंप्रज्वलीत तेजोमय भगवान श्रीरामांना मी नमस्कार करतो. युद्धभूमीत खर-दूषण, त्रिशिरा इ. राक्षसांशी युद्ध करताना ज्यांनी आपल्या लीलेने आपले मुखमण्डल सर्व दिशांना सर्वत्र दाखवले (व त्या सर्वांचा नाश केला) त्या सर्वतोमुख भगवान श्रीरामांना मी वंदन करतो. शरण येताक्षणीच जे मनुष्याचा सामान्य मोहमय मनुष्यभाव नष्ट करून त्याला लोकोत्तर ज्ञान तसेच विशिष्ट दिव्य शक्तींनी संपन्न करत व जे सर्व

विश्वात सिंहाप्रमाणे बलवान आहेत त्या नरसिंह श्रीरामांना मी नमस्कार करतो. ज्यांच्यामुळे वायू, सूर्य, अग्नी, इन्द्र, यम भयभीत होतात वा भयभीत असतात आणि पाप तर ज्यांच्या भयाने नेहमीच दूर पळते त्या भीषण श्रीरामांना मी नमस्कार करतो. जे आपल्या भक्तांकडून योग्यतेची अपेक्षा करत नाहीत ज्यांच्या उदार स्वभावाने सर्व काही देतात व जे सदा मंगलस्वरूप आहेत त्या परमभद्रस्वरुप सौजन्यमूर्ती भगवान श्रीरामांना मी नमस्कार करतो. ते आपल्या भक्तांच्या मृत्यूचे संपूर्ण उच्चाटन करून त्यांची सर्व अभिलाषा पूर्ण करतात याचे उत्तम उदाहरण पूर्वी दरोडेखोर असलेल्या महर्षी वाल्मीकींचे आहे. अशा मृत्यूचाही मृत्यू असणाऱ्या भक्तवत्सल भगवान श्रीरामांना मी नमस्कार करतो. ज्यांच्या चरणकमलाला नमस्कार करताच अधम पुरुषही उत्तम पुरुष बनतो. त्या जन्मादी षड्विकारांपासून मुक्त, सर्व देवदेवतांना वंदनीय असणाऱ्या भगवान श्रीरामांना मी नमस्कार करतो. मी (हनुमान) ही ब्रह्मैकात्म-भावाचा परित्याग करून दास्यभाव अर्थात सेव्य-सेवक या भावनेने अहर्निश लक्ष्मणासहित श्रीसीतारामांची उपासना करतो. भगवान श्रीरामांच्या भक्तांचे यमदूत सदैव दास / सेवक होतात, त्यांना दाही दिशा मंगलकारी होतात व सर्व सिद्धी त्यांच्या चरणी लीन होतात. हनुमानांनी सांगितलेले हे मन्त्रराजात्मक स्तोत्र जो नित्य पठण करील तो भगवान श्रीरामांचा भक्त होईल.

संकलन

**वसंत गोडबोले**
१२४, शनिवार पेठ, (नेने घाट),
पुणे - ४११०३०
मो. ९४२३८५८८२३

●●●

(पृष्ठ २० वरून)

**देव पूजनाचे उपचार प्रकार...**

पूजा केली! तो होऊ नये म्हणून हा विचार. विनम्रपणे शेवटी -

**यथा ज्ञानेन, यथा मीलितोपचारद्रव्यै : देशकालपरिस्थित्यनुरूपतः कृतपूजनेन श्रीभगवान् परमेश्वरः प्रीयताम् ।** ही भावना व्यक्त करणे.

वरील माहिती डॉ. शांताराम परशुराम आपटे लिखित 'वैदिक आन्हिके' या पुस्तकातून घेतली आहे. या पुस्तकाचा परिचय सद्धर्मच्या ऑक्टोबर २०१३ च्या अंकात पान १८ वर डॉ. श्रीराम महादेव भातखंडे यांनी करून दिला आहे. वरील माहिती या अंकात प्रसिद्ध करण्यास संमती दिल्याबद्दल आम्ही डॉ. आपटे यांचे आभारी आहोत. या उपचारांसंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास त्यांच्याशी संपर्क साधावा. तसेच त्यांचे वरील पुस्तक हवे असल्यास त्याची किंमत (रु. १६००/-) त्यांच्या कुठल्या बँकेतील खात्यात जमा करावी याची चौकशी त्यांच्याकडे करता येईल. त्यांचा दूरध्वनी क्रमांक व पत्ता :

**आपटे रुग्णालय**
राममारुती पथ,
गल्ली क्रमांक १, नौपाडा,
ठाणे (प.) - ४००६०२
दूरध्वनी क्र. - २५४२२७५६
(फोन रात्री १० ते १०.३० या वेळेतच करावा)

**संपादक**

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

कारगिलमधील विद्रूप करून पाठवलेली प्रेते, सोमालियन चाच्यांमुळे धरण्यात आलेले भारतीय खलाशी किंवा जॉर्ज फर्नांडिस यांच्यापासून माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना अमेरिकेत दिल्या गेलेल्या वागणुकीमुळे अजूनपर्यंत भारतीय मुत्सद्दी किंवा परराष्ट्रीय खाते कधी कासावीस झालेले आपण पाहिले नाही. राष्ट्रीय अस्मिताही यामुळे धोक्यात आल्याचे आपण कधी ऐकले नाही. नावातील जादू येथेच दिसून येते. एकूण एक राजकारणी आणि भारतातील सारे विद्वत्जन अमेरिकेन आपल्या राजदूताला दिलेल्या या वागणुकीमुळे व्याकूळ झालेले दिसतात. अर्थातच आपल्या राजदूताला अमेरिकेने दिलेली वागणूक, मग ती अमेरिकन कायद्यात बसणारी असली तरी असंस्कृतच होती आणि म्हणूनच आपली प्रतिक्रिया समर्थनीयच आहे.

अमेरिकेची आरेरावी आणि माजोरीपणा पहिल्या महायुद्धापासून, व्हिएतनाम ते अफगाणिस्तानातील युद्धापर्यंत जगजाहीर आहे. लैंगिक समानता, स्त्रीमुक्ती, मानवी अधिकार ते अगदी पर्यावरणाच्या नियमांपर्यंत अमेरिकेचे जगाला करावयाचे उपदेश व अमेरिकेतील वास्तव यांत कायमच अंतर दिसून आले. या सर्व अधिकारांना आणि समानतेला एक सांस्कृतिक संदर्भ असतो आणि त्यांच्यामधील संतुलन या सांस्कृतिक पार्श्वभूमीवरच साधायचे असते. पण या देशातले डावे, पुरोगामी, मुक्त विचारवंतांना मात्र या अधिकारांची अमेरिकन सांस्कृतिक कुरघोडी सोयीची वाटली. अमेरिकेचा हा दुटप्पीपणा आणि उर्मटपणा याबाबत लिहायचे म्हटले तर जगातील सर्व शाई संपेल. भारताचे बहुतेक सगळेच दूतावास व सरकारी नोकरीतील त्यांचे चालू असणारे व्यवहार हे कोणालाही उबग आणतील असेच आहेत. ही मंडळी तेथे गेल्यावर आपले नातेवाईक, खुशमस्करे यांची 'सुव्यवस्था' लावण्यात मग्न असतात. पाकिस्तानधार्जिण्या एका अमेरिकन व्यक्तीने आणि संस्थेने जगभर आयोजित केलेल्या परिसंवादास हेच संपादक, राजकारणी राष्ट्रहिताला सुरुंग लावून नुसतेच हजर राहिले नाहीत तर भारतच काश्मीरवर आक्रमण करत असल्याच्या निर्लज्ज प्रसाराला हातभारही लावत राहिले. अर्थातच एकांगी नि तकलादू निधर्मवाद आणि घराणेशाहीच्या मर्जीतले हे मुत्सद्दी असल्यामुळे परराष्ट्र खात्याला राष्ट्रीय धोरण धोक्यात आल्यासारखे कधीच वाटले नाही.

भारतातील पाण्यापासून गरिबीपर्यंत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कोट्यवधी रुपयांचा पैसा अमेरिकेतून येतो; तेव्हा अमेरिकेचा उर्मटपणा यांच्या गावीही नसतो! एम. एफ. हुसेन यांच्या अभिव्यक्तीवर झालेल्या अन्यायाने मुक्त कलावंतांची झोप उडते, परंतु तसलीमा नसरीन यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत बोलताना मात्र यांच्या जिभा लुळया पडलेल्या असतात. असले दुहेरी मापदंड सर्रास वापरणारे 'विचारवंत' हे वंद्य तर नाहीतच; पण निंद्य आहेत.

हिंदूंच्या धर्मशास्त्रामध्ये प्रत्येक पदाला, मग ते घरातील आई-वडील असोत की सामाजिक 'महाजन' असोत, काही जबाबदाऱ्या आणि बंधनांच्या चौकटी आखून दिल्या आहेत. 'जे माझे नाही ते मी घेणार नाही', ही रामायणातील भरताची शिकवण आपण कधीच विसरून गेलो

आणि आता अमेरिकन संकल्पनेप्रमाणे 'माझे ते तर माझेच, पण तुझे तेही माझेच' ही संस्कृती आपण स्वीकारली आहे. लाल दिव्यांच्या गाड्यांपासून ते टोल नाक्यांवरील कर्मचाऱ्यांनी टोल विचारला म्हणून धुडगूस घालणाऱ्या, मारामाऱ्या करणाऱ्या राजकारण्यांचा पदोपदी आढळणारा हा उर्मटपणा आपल्या चांगलाच अंगवळणी पडला आहे. या ढोंगी, आपमतलबी आणि स्वार्थी नोकरशाहा व राजकारण्यांनी अमेरिकेच्या उर्मटपणापेक्षा अधिक शरमेने मान खाली घालण्याची वेळ आपल्यावर आणली आहे. म्हणूनच शेवटी म्हणावेसे वाटते की, समाजाने, संतांनी सांगितलेल्या ''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले'' अशा व्यक्ती, त्या जरी दुर्मीळ असल्या तरी त्यांनाच आपले प्रतिनिधी म्हणून निवडणे किंवा स्वीकारणे हितकारक आहे, अन्यथा ही सर्वच मूल्यांची घसरण थांबवणे अशक्य आहे.

'यथा राजा तथा प्रजा ' अशीही उक्ती आपल्याला परिचित आहे. जुने धर्मग्रंथ जाळून नवीन समाज निर्माण करता येत नाही. द्वेष, मत्सर, आहे तेही नष्ट करते आणि नवीन 'भ्रष्ट' निर्माण करते. प्रगती आणि नावीन्याच्या भ्रामक कल्पनांनी लग्नापासून पालकत्वापर्यंतच्या सगळया संस्कारांचा आपण पोरखेळ करून टाकला. अमेरिकेची उद्योगशीलता, वक्तशीरपणा, तेथली ग्रंथालये, संग्रहालये आणि विद्यापीठांचे अनुकरण करावेसे आपल्याला वाटत नाही; पण त्यांचा लैंगिक भोगवाद, आत्मकेंद्रित स्वैराचार आणि उर्मट जडवाद आपल्याला स्वीकारावासा वाटतो हीच खरी शोकांतिका आहे. अमेरिकन चपला नि बूट घातलेल्या पायांची इतकी रेलचेल झाली आहे की या गर्दीत ती, बोले तैशी चालणारी वंदनीय पावले हरवून गेली आहेत.

●●●

लक्ष्मी केशव कार्यालयातून आपल्या न्यासाचे कामकाज केले जाते ते कार्यालय **पुनर्बांधणीसाठी** जानेवारी २०१४ पासून सुमारे दीड ते दोन वर्षासाठी संपूर्ण पणे बंद राहाणार आहे. म्हणून न्यासची सर्व प्रकाशने व इतर साहित्य, (जादा प्रती), गोदामात अन्यत्र हलवले आहेत. ''सध्दर्म'' त्रैमासिक नियमीतपणे प्रसिद्ध करण्याचा न्यासाकडून प्रयत्न होणार आहे, व त्रैमासिकाचे सर्व अंक नक्की प्रसिद्ध होतीलच. ह्याची सर्व देणगीदारांनी नोंद घ्यावी ही विनंती. पत्रव्यवहार लक्ष्मी केशव कार्यालयाच्या पत्त्यावर करावा. कार्यालय दूरभाष सुरू नसेल तर श्री. दीक्षित यांचे निवासाचे दूरभाषः ०२२-२५४७२००५ वा भ्रमणध्वनी ९८१९६९३१९५ वर संपर्क साधावा ही विनंती आहे.

**- संपादक व कार्यकारी विश्वस्त**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१.
**मुद्रण स्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१.